# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**<u>दिनांक १०-०८-२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

बुधवार दिनांक १० ऑगस्ट २०१६ रोजी (का.प.क्र-२५) मा.महापौर श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ११-१० वा वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.उपआयुक्त श्री.अय्युब खान, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१५. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१६. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१७. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१८. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
१९. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२०. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२१. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२२. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२३. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२४. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२५. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२६. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२७. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२८. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
२९. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर

३०. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३१. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३२. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३३. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३४. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३५. स.स. श्रीमती खरत सुरेखा गौतम
३६. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३७. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
३८. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
३९. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४०. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४१. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४२. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४३. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४४. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४५. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
४६. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
४७. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
४८. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
४९. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५०. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५१. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५२. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५३. स.स. श्री.शेख जफर अखतर
५४. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
५५. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
५६. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
५७. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
५८. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
५९. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६०. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
६१. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
६२. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
६३. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
६४. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
६५. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
६६. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
६७. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
६८. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव

६९. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७०. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
७१. स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे
७२. स.स. श्री.सोहेल शकील शेख
७३. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
७४. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
७५. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
७६. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
७७. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
७८. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
७९. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
८०. स.स.श्री.थोरात दिलीप गंगाधर
८१. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
८२. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
८३. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
८४. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
८५. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
८६. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
८७. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
८८. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
८९. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
९०. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९१. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
९२. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
९३. स.स.कु.जमादार सायली भागवत

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

श्री.राजेंद्र जंजाळ :या शहरात कार्यरत असलेल्या डॉ.बोरकर मॅडम यांना देशामध्ये असलेला सन्मानाचा पुरस्कार प्राप्त झाला. ३६ वर्षानंतर हा पुरस्कार भारत देशाला मिळाला. नक्कीच या शहराचे नाव भारत देशामध्ये मोठे झाले. त्याबद्दल त्यांचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा.

श्री.नंदकुमार घोडेले :यास अनुमोदन आहे. ठराव पास करून त्यांना निमंत्रीत करावे. तसेच माजी आमदार मा.एम.एम शेख यांची महाराष्ट्राच्या वक्फ बोर्डाच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करावे.

श्री.भगवान घडमोडे :यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :डॉ मंगला बोरकर यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे. त्याचे अभिनंदन करण्यात येते. तसेच मा.एम.एम.शेख साहेब यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.अफसर खान :माझ्या वार्डात साई कॉम्प्लेक्स जवळ ड्रेनेज लाईन लिकेज आहे. पिण्याच्या पाण्यामध्ये घाण पाणी येते. श्री.विटेकर यांना माहिती दिली. काम केले नाही. कंपनीला १७ कोटी दिले. घाण पाणी संदर्भात लेखी तक्रार केली. काम होत नाही. २० वर्षापासून अशी परीस्थिती नव्हती सर्व वार्डात अशीच परीस्थिती आहे जे अधिकारी काम करीत नसेल, त्याचेवर कार्यवाही करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माझ्या वॉर्डात २ महिन्यापासून ड्रेनेज लिकेजस आहेत. विकास नगरच्या समोर नाला वाहतो. तेथे घाण पाणी तुंबलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरात सर्वच ठिकाणी ही परिस्थिती आहे. ५ लक्षचे टेंडर काढले होते. ठेकेदार पैसे संपले काम होणार नाही असे सांगतात. तर कामे होणार की नाही. खुलासा करावा.

श्री.भगवान घडमोडे :पाणी,खड्डे,ड्रेनेजची समस्या मोठ्या प्रमाणात आहे. मा.आयुक्त सभेला उपस्थित नाही. आमचे प्रश्न सुटणार नाही. मा.आयुक्तांना येऊ द्यावे तोपर्यत सभा घेऊ नये.

श्रीमती शोभा बुरांडे :दीड वर्षात कोणतेच काम वार्डात झाले नाही. ड्रेनेज लाईनचे काम होत नाही.

श्री.भगवान घडमोडे :अतिक्रमणाबाबत प्रश्न देऊन महिना झाला. आता उत्तर दिले. तेही अर्धवट प्रशासन किती सक्षम हे यावरून दिसुन येते.

श्री.नंदकुमार घोडेले :मा.आयुक्तांना येऊ द्यावे. त्यानंतर लाईट, ड्रेनेज, पाणी व खड्डेचे प्रश्नाबाबत चर्चा करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :तीन प्रश्न दिले होते. एका प्रश्नाचे उत्तर मिळाले. तीन दिवस अगोदर उत्तर मिळणे आवश्यक आहे. मा.आयुक्त येत नाही, तोपर्यत ही सभा थांबवावी.

मा.महापौर :मा.आयुक्त येतील तेव्हा खुलासा घेऊ

श्री.गंगाधर ढगे :ए-१ रेटलिस्टची कामे बंद केली. परंतु आता खड्डे, ड्रेनेज, घाण पाण्याच्या समस्या सुटत नाहीत. आमच्या स्वेच्छानिधीतून काम करण्याची परवानगी द्यावी.

श्रीमती सायली जमादार:सातारा-देवळाई हा भाग महानगरपालिकेत समावेश झाला. तेथील कर्मचारी समावेश करण्याचा ठराव स्थगित केला. मान्यता द्यावी.

मा.महापौर :या संदर्भात अहवाल मागितला, नंतर निर्णय घेतला जाईल. पॉलीसी मॅटर आहे.

श्री.सय्यद मतीन :टाऊन हॉल ब्रीज जवळ रस्त्यालगत घाण पाणी साचते. पेव्हर ब्लॉक बसविणार होते. अद्याप काम केलेले नाही.

श्रीमती ज्योती अभंग :मनपाच्या दवाखान्यात औषधाचा तुटवडा आहे. दखल घ्यावी.

**प्रश्न क्रमांक ५३९ :स. श्री. राजेंद्र जंजाळ**

श्री.राजेंद्र जंजाळ :कर आकारणी संदर्भात चार प्रश्न केले होते. प्रश्न क्रमांक ५४१ चे उत्तरच दिले नाही. ठोस माहिती दिली नाही. ९०-९१ चे एक पुस्तक उत्तरा सोबत जोडून दिले. त्यानंतर कर आकारणी मध्ये मोठे चेंजेस झाले. कर आकारणी करतांना कोणते क्षेत्र ग्राह्य धरतो कोणते नाही? ही विचारणा केली होती. स्पेक कंपनीला मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचे काम दिले. करारनामा केला त्यात कोणत्या पध्दतीने कर आकारणी करायची. पहिल्या मजल्यास किती भाडेकरूंना

किती? कोणता पॅसेज धरणार कोणते वगळणार? याचा उल्लेख नव्हता. आता सुध्दा मालमत्ता कर आकारणी बाबत निविदा काढली. परंतु कशा पध्दतीने कर आकारणार उल्लेख होत नाही. कर कसा आकारायचा कसा? नाही हेच कुठे लिहिले नसेल, तर विश्वास कशावर ठेवणार? एका ठिकाणी एका व दुसऱ्या ठिकाणी दुसऱ्याच मिळकतीचा वेगवेगळा टॅक्स लागणार. डीव्हीजनला येणार, त्यावेळी लक्षात येईल. येथे हा कर असायला पाहिजे होता. तेंव्हा काय मायनस करणार? पैशाचे व्यवहार होणार, असा प्रकार होत असेल, तर कर प्रणाली कशी असावी? याचा फॉरमॅट करणे आवश्यक आहे. कर आकारणी कशा प्रकारे केली जाते. अनेक सामाजिक संस्थांना कर माफ केल्यानंतर नोटीस दिली जाते. या विभागाचे काम कसे होत आहे? जेथून निधी मिळणार तोच मिळत नाही. तर कामे होणार नाही. कोणत्या नियमा व कायद्यानुसार कर आकारतो.

कर निर्धा.व संकलक :कर आकारणी करतांना १९८२ च्या अगोदर नगरपालिका असतांना चटई क्षेत्र ग्राह्य धरण्यात येत होते. त्यातून टॉयलेट-बाथरूम पॅसेज वजा करण्यात येत होते.

श्री.राजेंद्र जंजाळ :जे पॅसेज वगळता त्या बाबतीत ठराव किंवा ॲक्ट मध्ये आहेत का?

कर निर्धा.व संकलक :तसा कुठेही नियमात उल्लेख नाही. ही पध्दत १९८२ ला नगरपालिका असतांनाच होती. त्यानुसार कर आकारतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :पध्दतीनुसार नाही तर ॲक्ट नुसार मनपाचे कामकाज चालते.

मा.महापौर :कोणत्या नियमाने कर आकारणी केली जाते? नियमात बदल करणे आवश्यक आहे का? तसे असेल तर मंजूरीसाठी आणावे.

श्री.राजगौरव वानखेडे :कर कसा आकारायचा? अधिकारी यांना माहित नाही. इतर मनपामध्ये काय परिस्थिती आहे? माहिती घ्यावी. हॉटेल, मॉल्स, संस्था असेल यांना कोणता कर आकारला जातो?

प्र.मा.आयुक्त(श्री.खान) :कलम १२७-१ अ नुसार शहरातील जमीन व इमारतीवर मालमत्ता कर आकारतो. कराच्या बाबतीत उपनियम करून घ्यायला पाहिजे. चटई क्षेत्र जे वापरात येणारे असते, पॅसेज संडास-बाथरूम वगळता बाकी वापरात येणारे क्षेत्रास कर आकारणी करतो. जीबी समोर उपनियम ठेवून कार्यवाही करावी लागेल. चटई क्षेत्रावर कर आकारणी करीत होतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :उपनियम का केले नाही. काहींना सर्वच जागेवर टॅक्स तर काहीना वापराच्या जागेलाच टॅक्स असे झालेले आहे. दुरूस्ती करण्याची गरज आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :टॅक्स लावणारे कर्मचारी टेक्नीकल नाही. वर्ग-४ चे कर्मचारी मेजरमेन्ट घेतात.

श्री.राजू शिंदे :कर आकारणी अधिकारी टेक्नीकल असावा. त्यांना त्यातील ज्ञान असावे. अधिकाऱ्यांच्या वेळेवर बदल्या होतात. नवीन अधिकारी यांना समजण्यातच सहा महिने जाते. त्याचा वसूलीवर परीणाम होतो.

श्री.अफसर खान :योग्य जो असेल तो कर लावावा.

श्री.दिलीप थोरात :माझ्या वार्डात एकाच अपार्टमेन्ट मध्ये दोन फ्लॅटला वेगवेगळा कर आकारलेला आहे. यापूढे असे होऊ नये काळजी घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :डी पी कुलकर्णी यांना निलंबीत केले, तेंव्हा बांधकाम विभागात उपअभियंता व क. अभियंता यांची संख्या किती होती? १०० कोटी एलबीटीतून शासन अनुदान

देते. १०० कोटी वसुली झाली पाहिजे. अधिकारी नसल्याने वसुली होत नाही. नाशिक मनपाचे क्षेत्र या मनपा एवढेच आहे. तेथे अधिकारी संख्या जास्त असल्याने वसुली होते. वसुली येत नसल्याने येथे विकास होत नाही.

श्री.राजू शिंदे :स्पेकने सर्वे केला तो त्यानुसार त्या मिळकतीला कर लावण्यासाठी ग्राह्य धरतो का? एनआरव्ही कशी फिक्स केली जाते? माहिती घेण्यात यावी.

श्री.सय्यद मतीन :सर्व सुविधा दिल्यातर नागरीक कर भरतील

श्री.नासेर सिद्यीकी :नाशिक, पुणे, मुंबई येथे कशा प्रकारे कर आकारणी होते? याची माहिती घेणे आवश्यक आहे. वसुली करण्यामध्ये प्रशासन कमी पडते आहे. अधिकारी यांना प्रशिक्षण द्यावे.

श्री.अब्दुल नाइकवाडी :हैद्राबाद येथे १०० टक्के वसुली होते. ट्रेनिंगसाठी आपले अधिकारी गेले होते. काय ट्रेनिंग घेतले? याची माहिती द्यावी.

कर निर्धा. व संकलक :सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केला. त्यानुसार कोणत्या इमारतीत कशी कर आकारणी केली जाते? या सर्व गोष्टीचा समावेशक झालेले आहे. ९०-९१ ला या विभागामध्ये मी काम केलेले आहे. कलम १२७ अन्वये कर आकारणी केली जाते.

श्री.रेणुकादास वैद्य :जे नियम करावे लागणार. ते सभेपुढे आणावे त्यानुसार काम करावे.

श्री.शेख अब्दुल ताहेर :सोलार सिस्टीम व रेन वॉटर हार्वेस्टिग वर करामध्ये सवलत देतो. एकदा कागदपत्र सादर केल्यानंतर दर वर्षी पुन्हा कागदपत्र मागविण्याची सक्ती करू नये. तसेच पाण्याचे दर कमी केले. परंतु काहींनी २०१७ पर्यंत कर भरणा केले. त्यांना कशा प्रकारे सुट देणार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :कर आकारणी विभागासाठी शासनाकडे अधिकारी आले. अशी माहिती मिळाली त्यांचेकडून कर आकारणी बाबत माहिती घ्यावी.

कर निर्धा.अधि.(श्रीमती खरपे): माझे नाव सरिता खरपे, मुख्याधिकारी संवर्गातून आहे. २००३ चे माझे जॉईनींग आहे.कर आकारणी बाबत दोन पध्दती एक रेन्टटेंबल पध्दत व कॅपीटल व्हॅल्यू मेथर्ड अशा पध्दती आहे.कोणती पध्दती स्विकारायची त्या स्थानिक संस्थेचा निर्णय असतो.काही महापालिकेने कॅपीटल व्हॅल्यू मेथड स्विकारली. मला पदस्थापना सहा.कर निर्धा. व संकलक म्हणून व पोस्टींग माझी सहाय्यक आयुक्त-१ म्हणून आहेत.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कोणत्या स्पेसला कोणता दरानुसार कर आकारातो. याची माहिती द्यावी.

मा.महापौर :सर्व निमयावली तयार करावी लागेल. सर्वसाधारण सभेसमोर उपनियम आणावे मंजूरी होईल, त्यानंतर कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :मालमत्ता कराच्या बाबतीत नेमकी कार्यप्रणाली कशी असावी? ती ठरविली पाहिजे. १ ला २ रा व ३ ऱ्या मजल्याला किती पार्कींग सोडायची? किती पॅसेज सोडायचा? स्टेअर केसला, पार्कीगला, किती टॅक्स असावा? कमर्शियल मालमत्ता यास कोणत्या पध्दतीने टॅक्स लावायचा? त्याची मुळ पध्दत काय? जी एनआरव्ही काढतो त्यानुसार ते भांडवली मुल्य ग्रहीत धरायचे का?

उपनियम तयार करीत असतांना उपनियमानुसार येणाऱ्या काळात जी काही एजन्सी फिक्स करणार आहोत, त्यांना सुध्दा कम्प्लसरी केले पाहिजे की, महापालिका जो फॉरमॅट आहे. त्यानुसार टॅक्स आकारला पाहिजे

महापालिकेच्या क्षेत्रात ज्या मालमत्ता आहेत, त्या ब्लॉकवाईज ॲडेन्टीफाय केल्या पाहिजे, त्यासाठी एक अधिकारी नेमले पाहिजे. त्या संचिकेवर त्या अधिकाऱ्याचे नाव असावे. जर चुकीचा टॅक्स आकारला तर संबंधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही होईल, अशी सुध्दा तरतूद त्यात पाहिजे. म्हणजे जे कर लावण्याच्या व वसुलीच्या बाबतीत गैरप्रकार होत आहे, ते होणार नाही. जो पर्यत उपनियम ठरवित नाही, तोपर्यत जी टेंडर प्रोसेस करीत आहोत, ती थांबविण्यात यावी. जे आवश्यक आहे. त्या सर्व बाबींचा समावेश ॲग्रीमेन्टमध्ये केला पाहिजे. उपनियमा बाबत प्रस्ताव तयार करून सर्व पक्षाचे गटनेत्यांच्या निदर्शनास आणून त्यानंतर सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करावा.

मा.महापौर :आताच सभागृह नेता श्री.राजेंद्र जंजाळ यांनी जी सुचना केली, त्याचे पालन करून ज्या नियम, अटी व शर्ती करायच्या त्या सर्वसाधारण सभेपूढे आणाव्यात. कोणत्या मालमत्तांना कुठल्या पध्दतीने कर आकारला जातो? ते स्पष्ट होत नाही. मालमत्ता कर आकारतांना नागरीकांची दिशाभूल होऊ नये. तसेच जास्तीचा टॅक्स लागू नये, योग्य प्रकारे कर लागावा. या साठी एक नियमावली तयार करून सर्व गट नेत्यांची एक बैठक घेऊन त्यांचे समोर आणावे. त्यानंतर सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात यावी. कर आकारणी नियमावली तयार न करता काढलेली निविदा रद्द करण्यात यावी. नियमावलीच्या मान्यतेच्या अधीन नवीन निविदा सात दिवसांची मागविण्यात यावी. आठ दिवसाच्या आत नियम तयार करावे. पुढील बैठकीत निर्णय घेतला जाईल. जे नियम तयार केले जातील, त्यात सर्व बाबींचा समावेश करावा. तोपर्यत मालमत्ता कराच्या संदर्भात जी टेंडर प्रोसेस चालू आहे. ती थांबविण्यात यावी.

श्रीमती शोभा वळसे :प्रभाग समिती-४ चे कार्यालयाचे छत ढासळत आहे. दुरूस्त करण्यात यावे.

श्री.ज्योती पिंजरकर :वार्डात २५ टक्के लाईट बंद आहे. काम करण्याबाबत कळविले परंतु काम केले जात नाही.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी. लाईट बाबतची समस्या सोडवावी.

**प्रश्न क्रमांक ५४३ :स.श्री. भगवान घडमोडे**

श्री.भगवान घडमोडे :प्रश्नाचे उत्तर आता मिळाले. दोन महिन्यात माहिती तयार करण्यास लागेल असे म्हटले. आतापर्यत प्रशासकीय विभागाने काय कार्यवाही केली?

या वेळी संबंधीत अधिकारी, खुलासा करण्यासाठी सभागृहात उपस्थित नसतात.

**प्रश्न क्रमांक ५४४ :**

श्री.भगवान घडमोडे :रामनगर भागात जलवाहिनीचे काम सुरू केले होते. बंद का केले? उत्तर दिले नाही.

मा.महापौर :आजच्या सभेला मा.आयुक्तही नाही. महत्वाचे विषय आहे. ते येत नाही, तोपर्यत सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दु.१२.२० वा. पुन्हा सभा १.२० वा सुरूवात)

या वेळी मा.आयुक्त सभागृहात उपस्थित असतात व महापौर म्हणून मा.उपमहापौर श्री.प्रमोद राठोड हे सभेचे कामकाज चालवितात.

श्री.भगवान घडमोडे :शहरातील खड्डे कधी बुजविणार? नागरीक जाब विचारतात. पावसाळ्यापूर्वी अशा कामाचे नियोजन करायला पाहिजे. मुख्य रस्ते चांगले नाही, पायी चालता येत नाही. अनेक अपघात होतात. प्रशासन गांभीर्याने घेत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :नागरीकांना खड्ड्यांमुळे त्रास होतो. आजारी पडत आहे. मा.आयुक्त वार्डात व्हिजीट करतात. या वेळेस पाऊस जास्त आहे. हडको-सिडको भागात सर्वच रस्त्यावर खड्डे झाले. बैठका घेतल्या, नियोजन केले नाही. ऑक्टोबर नोव्हेंबर दरम्यान आशिया खंडातील पर्यटन परीषद शहरात होणार, जगातील लोक येणार आहे. नुकतेच गणपती आगमन होणार आहे. खड्डे बुजविण्यात यावे.

श्रीमती मनीषा मुंढे :वार्डात खड्डे पडले, फवारणी होत नाही. १२-१३ गल्यांमध्ये घाण पाणी येते.

श्रीमती माधुरी देशमुख :वार्डात खड्डे पडले, स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत आहोत. सण-उत्सव जवळ येत आहे. डांबर प्लॅन घेण्याचे ठरविले होते. बंद केले. माझ्या वार्डात १०० टक्के टॅक्स भरणारे लोक असतांना, विकास कामे नाही. अंदोलन करावे लागणार काय? महिलांचा,सदस्यांचा फोन अधिकारी उचलत नाही. महिला सदस्यांचे पती येऊ नये म्हणुन नियम केला प्रशासनाचे अभिनंदन. आम्ही महिला स्वत: काम करून घेऊ परंतु प्रशासन काम व्यवस्थीत करीत नाही. अधिकाऱ्यांचा प्रतिसाद मिळत नाही.

या वेळी सर्व महिला डायस समोर जमा होतात. मोठमोठ्याने बोलतात.

मा.आयुक्त :स.सदस्यांनी फोन केला. अधिकारी उचलत नसेल तर माझ्याकडे माहिती द्यावी कार्यवाही केली जाईल.

श्रीमती समीना शेख :फोन केला उचलत नाही. पत्राचे उत्तर देत नाही. अधिकाऱ्यावर कार्यवाही का करत नाही?

मा.महापौर :महिला सदस्यांनी काम घेऊन आले तर काम केले पाहिजे. महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. त्यांचे सहकारी त्यांचे सोबत असेल. काम करण्यास मदत व्हावी हा हेतू त्या मागचा आहे. यात मार्ग निघाला पाहिजे. प्रशासनाने दखल घ्यावी व काम करण्यास सहाकार्याची भावना ठेवावी.

श्रीमती ज्योती अभंग :माझ्या वार्डातील संचिका मंजूर होत नाही. संचिका घेऊन सदस्यांना फिरावे लागते, माहिती घ्यावी लागते.

श्रीमती सिमा खरात :टीव्ही सेंटर ते हडको कॉर्नर रस्त्यावरील लाईट बंद आहेत. फोन केला असता, उचलत नाही. विभागातून केबल मिळत नाही म्हणून लाईट लावण्यात येत नाही.

श्री.राजू शिंदे :शहरात सर्व भागात खड्डे पडले आहेत. माझे वार्डात १०० टक्के कर वसुल होतो डिफरच्या कामातून काही रक्कम शिल्लक होती. ते टेंडर जास्त दराने दिले गेले. दुसरे टेंडर काढून काम करू, असे मा.आयुक्तांनीच मला आश्वासन दिले. एक महिना मसीहाचे अधिकारी,पदाधिकारी एकत्र झाले. मी गेलो होतो. सदर स.पदाधिकारी मा.आयुक्ताकडे भेटण्यासाठी आले. शहर अभियंता यांना मा.आयुक्तांनी माझे वार्डातील शिल्लक काम करण्याचे आदेशीत केले. तरीही ते काम का? होत नाही.

श्रीमती संगिता वाघुले :सदस्यांच्या प्रश्नाला अधिकारी रिस्पॉन्स देत नाही.

मा.आयुक्त :अधिकारी यांनी रिस्पॉन्स दिला नाही तर कार्यवाही होईल. विनंती स.सदस्यांचे पती यांना माझेकडे पाठवू नये. स.सदस्यांच्या ज्या अडचणी असतील त्यासाठी सोमवार व शुक्रवार या दिवशी मी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहिल. असलेले प्रश्न सॉल्व्ह करू संचिका गहाळ झाली. असेल तर दुय्यम संचिका तयार करता येते.

श्री.राजगौरव वानखेडे :इतर दिवशी मा.आयुक्त भेटणार नाही का?

मा.आयुक्त :इतर दिवशी बैठकीत असेल साईटवर असेल तर भेटणे अशक्य होईल.

श्री.राजू शिंदे :२४ तास, सात दिवस मा.आयुक्त वार्डातील कामासाठी भेटले पाहिजे, आम्ही वार्डातील कामे घेऊन येत असतो. आम्ही जेव्हा येऊ, तेव्हा प्रशासन भेटले पाहिजे. सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत हा वेळ ११५ सदस्यांना पुरसा नाही

मा.महापौर :वार्डातील समस्या केव्हाही निर्माण होऊ शकते. २४ तास जनतेच्या कामासाठी आम्हाला उपलब्ध रहावे लागते. प्रशासनाने उपलब्ध रहावे. अधिकारी ही उपस्थित राहण्याचे आदेशीत करावे. वार्डातील लहान कामे होत नसेल तर योग्य नाही. विकास कामासाठी स.सदस्यांशी समन्वय होणे. आवश्यक आहे. पाण्याची वेळ नाही, नागरीकांचे फोन येतात. अशी परीस्थिती निर्माण होणार नाही. प्रशासनाने अभ्यास करावा. प्रशासन म्हणून मा.आयुक्ताशी आम्ही बोलतो. कर्मचारी नाही म्हणून कारण सांगतात. ही प्रशासनाची बाब आहे. तातडीची कामे व्हावीत. मा.पालकमंत्री यांनी कचऱ्याच्या गाडया घेणेसाठी निधी उपलब्ध करून दिला. अद्याप कार्यवाही का नाही?

श्री.दिलीप थोरात :प्रशासन २४ तास उपलब्ध असावे. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी समन्वयाने काम करावे समांतर योजना रद्द करण्याचा निर्णय घेतला. मनपा काम करणार होते. कोणतेही नियोजन केले नाही. ठराविक दिवशी भेटणार, असे बंधन मा.आयुक्तानी सदस्यांना घालु नये.

श्री.राजू शिंदे :मा.श्री. केंद्रेकर साहेबाकडे सिडको, म्हाडाचा चार्ज असतांना महापालिकेत वाटले तेव्हा भेटत होते. सर्वांचे समाधान होत होते. वार्डातील कामे असतात तेंव्हा मा.आयुक्त आम्हाला भेटलेच पाहिजे. अशी आमची भुमिका. मी वार्डातील समस्या बाबत तीन फोटो पाठविले. काही रिस्पॉन्स मिळाला नाही. माझ्या वार्डात डिफरची कामे बाकी होती त्यातील निधी शिल्लक होता. त्या रक्कमेतून टेंडर काढून, राहिलेली कामे केली जातील. असे आश्वासन मिळाले होते. परंतु आता काम होत नाही. असे सांगण्यात येते.

मा.आयुक्त :डिफरचे काम होते ते रद्द केले आहे. आता नवीन कामासाठी निधीची आवश्यकता आहे. १५० कोटीची मागणी आहे. या भागात कर मिळतो. कामे करायला पाहिजे. मनपाचे उत्पन्न कमी व देणे जास्त आहे. एमआयडीसीचे मा.सचिव येणार आहे. त्यांचेकडे या भागात कामे होणेसाठी १०० कोटीच्या निधीची मागणी करणार आहे. एकाच वार्डात ४-५ कोटीचे काम करणे शक्य नाही.

श्रीमती ज्योती अभंग :माझ्या वार्डात गुंठेवारी भागात रस्ता व्यवस्थीत नाही.

श्री.राजू शिंदे :माझ्या वार्डातून एमआयडीसीतून ७० कोटी कराचे जमा होतात. ४ कोटी खर्च करू शकत नाही का? इतर ठिकाणी पैसे खर्च केले जाते. वार्डात कामे झाली नाही. तर मी मा.कोर्टात दाद मागणार आहे.डीपी पलॅन साठी सरकारी वकील लावण्या ऐवजी खाजगी वकील लावून २८ लक्ष खर्च केले. फायदा काहीच झाला नाही. डी पी प्लॅनचा व वकीलाचा काहीच संबंध नाही. तरी पैसे कसे खर्च केले.

मा.आयुक्त :महापालिकेच्या फायद्याचा विषय असेल, तर वकील लावावेच लागणार होते.

मा.महापौर :७०-७५ कोटी वसुल होत असेल, तर त्या वार्डात विकास कामे व्हावीत. ४-५ कोटी खर्च करणे योग्यच होईल. जेथे ले-आऊट झालेला आहे, त्या भागातही विकास करायला पाहिजे. तरच लोक कर भरतील. सर्व गोष्टी विचारात घेऊन त्या-त्या भागात विकास कामे करावी.

श्री.राजू शिंदे :सर्व कामगार काम एमआयडीसी भागात कंपनीत कामास येत असतात. रस्ते नाही, लाईट नाही. रात्री काही वेळा कामगारांना कंपनीत थांबूनच काम करावे लागते. येता येत नाही. अशी परीस्थिती आहे. समांतर आपण बैठक घेतली त्यात ही योजना चुकीची अधिकारी यांनी काम केले चुकीचे शासनाने पैसे दिले ते चुकीचे निविदा चुकीची असे प्रशासनाने म्हटले होते. मनपाच पैसे कंपनीला देत गेलो. त्यावेळी मी समांतर बाबत कॅव्हेट दाखल करण्याचे सुचना केली होती. समांतर बाबत ३० तारखेला निर्णय घेतला. त्यानंतर समांतर एजन्सीला ८.३४ कोटी रूपये का देण्यात आले? एक दीड महिना झाले पाणी येत नाही. घाण पाणी येते. माझ्या वार्डातील २४ लोक आजही ॲडमीट आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :एक एक विषय चर्चेला घ्यावेत.

मा.महापौर :१० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२.०५ पुन्हा २.४५ सभेला सुरूवात).

या वेळी सभेचे पिठासीन अधिकारी (मा.महापौर) म्हणून श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे हे स्थानापन्न होतात.

श्री.भाऊसाहेब जगताप :स.सदस्या श्रीमती रेशमा कुरैशी या उपोषणास बसलेल्या आहे. भगवान शिक्षण प्रसारक मंडळा संस्थेचा संदर्भात सभागृहात चर्चा झाली. कार्यवाही केली नाही.

मा.आयुक्त :या प्रकरणात मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे सुनावणी झाली होती अंतिम निर्णय आलेला नाही.

श्री.भाऊसाहेब जगताप :त्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र नाही फायरची सिडकोची एनओसी नाही सध्या हॉस्पीटल चालू आहे. तात्काळ सील करावे. शासनाने स्थगीती दिली. असतांना दवाखाना चालू आहे.

श्री.भगवान घडमोडे :तेथे अगोदरच हॉस्पीटल आहे. रूग्णांना सेवा मिळते. ते बंद करणे योग्य नाही.

मा.आयुक्त :तक्रार केली त्यानुसार उद्याच टीम पाठवून एनओसी बाबत माहिती घेतली जाईल. हॉस्पीटल चालवितांना नियमाप्रमाणे चालवावे लागते.

श्री.अयुब जागीरंदार :खड्डे बुजविण्या बाबत ७ दिवसात कार्यवाही होईल. बैठकीत निर्णय दिला होता. आम्ही अधिकारी यांना भेटण्यास जातो. भेटत नाही. काम वेळेवर करीत नाही. त्यामूळे आयुक्तांना भेटण्याची वेळ येते. जनतेच्या कामासाठी २४ तास मा.आयुक्तांनी उपलब्ध असायला पाहिजे. रस्त्यावर आम्हाला नागरीकांचे गाऱ्हाने ऐकावे लागते. दोन महिन्यात काम झाले नाही. खड्डे ताबडतोब बुजवावे.

बेगमपूरा भागात २१ दिवसापासून पाणी नाही चिश्तिया कॉलनी किराडपूरा रहिमानीया कॉलनी भागात घाण पाणी येते. लाईट बंद आहे ड्रेनेजचे घाण पाणी येत आहे.

श्रीमती मनीषा लोखंडे :वार्ड १६ मध्ये मुरूम टाकण्यात यावा.

श्रीमती ज्योती अभंग :वार्ड ४, चेतनानगर भागात गुठेवारी आहे. रस्ता नाही, पाण्यामूळे खड्डे व चिखल झालेला आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :शहरात हीच परीस्थिती आहे. ५-५ लक्षचे मुरूम टाकण्याचे मंजूर केले. तातडीने काम करण्याची गरज आहे. मुरूम टाकला, चिखल होतो. चांगल्या दर्जाचे काम कसे होईल त्याप्रमाणे करावे.

श्री.रामेश्वर भादवे :३० तारखेला पत्र दिले. पीएस पाटील दवाखाना ते मनपा शाळापर्यतच्या रस्त्यावर खड्डे पडले. तीन वर्षापासून रस्त्याचे काम मंजूर होते. ठेकेदाराने काम केले नाही. त्यांना बील दिले की नाही माहिती घ्यावी. स्पील मधील काम असल्याने नवीन बजेट मध्ये घेता येत नाही. ठेकेदारास पैसे दिले, तरी ही काम करीत नाही. ब्लँकलिस्ट करावे.

मा.महापौर :ठेकेदारास पैसे देऊनही काम करीत नसेल तर कार्यवाही करावी.

श्री.विजय औताडे :१५ महिन्यापासून काम होत नाही. १५ लक्ष प्रत्येक वार्डासाठी दिले होते त्यातून काही कामे झाली. २०१२ ची प्रलंबीत कामे होत नाही. माझ्या वार्डातून बेटरमेन्ट चार्जेस मधून मोठा महसूल जमा झाले. मुरूमही टाकत नाही. गुंठेवारी भाग असेल, तर मुरूम डांबर टाकावे. जेथे लेआऊट मंजूर आहे. तेथील कामे तातडीने कामे करावी.

मा.महापौर :एकूण अंदाजपत्रक किती केले? मंजूर किती झाले? वर्क ऑर्डरची किती आहे? वर्क ऑर्डर दिली असेल तर काम करून घ्यावे नसता, त्यांना ब्लॅकलिस्ट करावे. लेआउट मध्ये कामे करायला पाहिजे. दोन तीन बैठकीत चर्चा करतो. कार्यवाही होत नाही.

श्री.अजीम अहेमद :१६ महिन्यात एक विकास कामाची संचिका होती, तीही रिजेक्ट केली.

श्री.नासेर सिद्यीकी :समांतरचे व ड्रेनेज लाईनचे कामे एजन्सी करीत असतांना रस्त्यात मोठे खड्डे पडत आहे. या एजन्सीकडून रस्त्यांची दुरूस्तीची कामे करून घ्यावी.

श्री.अफसर खान :डाबंरीकरण केल्यानंतर मुदत पुर्वच पुन्हा त्या रस्त्याची पॅचवर्कची कामे करावी लागत असेल, तर संबंधीत ठेकेदाराकडून ती रक्कम वसुल करावी. त्यास ब्लॅकलिस्ट करावे. लिटील फ्लॉवर हायस्कूल ते मिलकॉर्नर व टाऊनहॉल पर्यत मस्कट कन्स्ट्रक्शन यांनी सहा महिन्यापूर्वीच काम केले. रस्ता खराब झालेला आहे. बोगस काम करणारे यांच्यावर ठोस कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :एखाद्या रस्त्याचे काम केल्यानंतर मुदतीच्या आत खराब होत असेल तर संबंधीत ठेकेदार व अधिकारी यांचेवर कार्यवाही केली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :पुंडलीकनगर रस्त्यावर खड्डयामूळे अपघात झाला. मुरूम टाकण्याचे टेंडर काढले. प्रोसेस मध्ये आहे. काम करण्यास उशीर होत असेल तर स्वेच्छानिधी वापरण्याची परवानगी द्यावी. गुंठेवारी भागात कामे करता येतील.कामावर नियंत्रण अधिकारी नेमावे कामापुर्वीचे व नंतरचे फोटो घ्यावे. मागच्या वर्षीचा निधी अजून शिल्लक आहे. लॅप्स झाला.

श्री.गंगाधर ढगे :टेंडर होऊन कामे करण्यास उशीर होतो. स्वेच्छानिधी वापरण्याची परवागनी द्यावी.

मा.आयुक्त :स्वेच्छा निधीतून अति तातडीचे काम असेल तर करायलाच पाहिजे. तशा सुचना देण्यात येतील. काम करणे अगोदरचे व नंतरचे फोटो घेऊन नियमात जे आहे त्या प्रमाणे कार्यवाही करता येईल.

श्री.अजीम अहेमद :रोषणगेट येथील दोन महिन्यापासून जाळी तुटली. दुरूस्त केले नाही.

मा.महापौर :तातडीचे काम असेल, तर स्वेच्छा निधीतून काम करता येत असेल तर नियमाच्या चौकटीत बसून काम करण्यात यावे.

श्री.अब्दुल मो.नाविद :टेंडर काढणे व वर्क ऑर्डर पर्यत किती वेळ लागतो. माझ्या वार्डात नाल्यावरील पुल तोडला, तेथे पाहणी केली काम सुरू केले नाही. एकच रस्ता माझ्या वार्डात येण्यास आहे. मुरूम टाकला जात नाही.

श्री.ऋषीकेश खैरे :स्वेच्छानिधीतील १.५० लक्षचे काम प्रोसेसमध्ये आहे. ४.५० लक्ष अजून निधी बाकी. या वर्षीचे ६ लक्ष एवढी रक्कम बाकी आहे. टेंडर प्रोसेस मध्ये आहे वगैरे कारण सांगितले जाते. एक काम होत नाही. जनतेला आम्ही काय उत्तर द्यावे.

श्री.नंदकुमार घोडेले :उपलब्ध असलेल्या एजन्सीकडून स्वेच्छानिधीची कामे करण्याची परवानगी प्रशासनाकडून असावी.

मा.आयुक्त :एक,दोन,तीन,पाच लक्षचे काम असेल तर टेंडर नुसार करावे लागेल. किरकोळ कामे स्वेच्छानिधीतून करता येतील. त्याबाबत एक नियमावली तयार करून दिली जाईल. प्रत्येक प्रभाग समिती निहाय एक एजन्सीच फिक्स करून दिली जाईल. यात किरकोळ कामे करता येतील.

श्री.नंदकुमार घोडेले :तातडीचे काम करायचे असेल तर २५ हजार पर्यत मुभा द्यावी

श्री.दिलीप थोरात :तातडीचे काम करून घेतल्यानंतर पेमेंन्ट देणे बाबतही प्राधान्यक्रम ठेवावा. तातडीने ते अदा केले जावे.

श्रीमती माधुरी देशमुख :खड्डे बुजवणे, मुरूम साठी पैसे नाही सांगता. अधिकारी कर्मचारी वेतनावरील खर्च बाबत प्रश्न केला, दर महा वेतनावर १३० कोटी ९८ लक्ष व वार्षीक खर्च १५७१ कोटी ८१ लक्ष खर्च होतो. नमूद केले नागरीक टॅक्स भरतात. वेतनावरच खर्च करणार काय आम्ही आमचे एक महिन्याचे मानधन देण्यास तयार आहोत. अधिकारी कर्मचारी यांनीही अर्धा महिन्याचे वेतन द्यावे. यातून अनेक प्रश्न सुटतील.

श्री. जफर खान :इंदिरानगर बायजीपूरा रस्ता खराब झाला. शालेय मुलांचा जातांना अपघात होतात. या रस्त्यावर मस्जीद मंदीर आहे. रस्त्याच्या बाजूने ड्रेनेजचे पाणी वाहते. जेटींग मशीन मिळत नाही तसेच मा.आमदार,खासदार यांचे मानधन वाढले. त्याप्रमाणेच स.सदस्यांचे सुध्दा ३० ते ३५ हजार मानधन करावे.

शहर अभियंता :या ठिकाणी १५ दिवसापुर्वी भेट दिली. नाल्याच्या प्रश्न आहे. अंदाजपत्रक तयार केले.निविदा काढली आहे. २-३ दिवसात कार्यवाहीस सुरू होईल. रस्त्याचे अंदाजपत्रक केले, प्रोसेस मध्ये आहे. टेंडरला २१ दिवसाची नोटीस काढली जाते. दुसऱ्यांदा असेल तर १५ दिवस तिसऱ्यांदा असेल तर ७ दिवस असते. तिसऱ्यांदा एक टेंडर आले, तरी मंजूर करावे लागते.

श्री.राजू शिंदे :६७ -३ सी मध्ये तातडीचे काम करण्याचा मा.आयुक्तांना अधिकार आहे.

श्री.सय्यद मतीन :बजेट मंजूर केल्यानंतर १५ दिवसाच्या आत अंदाजपत्रक तयार केले व पुढील प्रोसेस केल्यास ६७ -३ सी चे अधिकार वापरण्याची गरज पडाणार नाही. जे ई वेळेवर अंदाजपत्रक तयार करीत नाही. संचिकांचा पाठपुरावा सदस्यांनी करावा लागतो. खिल्लारे कन्स्ट्रक्शनचे ड्रेनेज लाईनचे काम चालू आहे. रस्ते खोदून ठेवले, दुरूस्त केले नाही. चौकशी करावी. टाऊन हॉल येथे ब्रीजच्या जवळील काम होते, घाण दुर्गधी येत होती. कामाची मा.आयुक्त यांनी पाहणी केली काम सुरू केले प्रशासनाचे धन्यवाद.

मा.आयुक्त :पुर्ण यंत्रणा सोबत घेऊन एकाच वेळी जास्तीत जास्त कामाचे अंदाजपत्रक तयार करून घेणार. मागिल वेळेस ८२,८३ अंदाजपत्रक तयार केले.

श्रीमती समीना शेख :भुमीगत गटार योजने काम चालू आहे. रस्ते खोदले ते कोण बुजविणार आहे. रोषणगेट, बायजीपूरा, कटकटगेट, संजयनगर, जिन्सी या भागासाठी एकच कब्रस्तान आहे. जवळच खड्डा पडला. कार्यवाही होत नाही.

शहर अभियंता :एजन्सीच्या मार्फत होत असलेल्या कामामूळे पडणारे खड्डे संबंधीत ठेकेदार यांनी बुजविले पाहिजे तशा सुचना दिल्या आहे काही बुजविले आहे वरचे वर मुरूम टाकणे चालू आहे. सुचना केली. त्या भागात मी स्वत: पाहणी करून कार्यवाही केली जाईल.

श्री.जमीर कादरी :पावसात रस्त्याचे काम करता येत नाही असे सांगतात. खिल्लारी कन्स्ट्रक्शने अनेक रस्ते खोदले जे खोदकाम केले ते बुजविले पाहिजे कटकटगेट ते पोलीस मेस पर्यत रस्ता खोदून ठेवला काम केले नाही.शहरात अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:मुथीयान कॉर्नर ते शिवमंदीर पर्यत रस्त्यातील पुल बांधण्यासाठी निवेदन दिले. प्रशासनाने पाहणी केली, अधिकारी सांगतात पैसे नाही. माझ्या वार्डात १०० टक्के टॅक्स वसुल होतो. ३५-३६ लक्ष खर्च या पुलासाठी अपेक्षीत आहे.

मा.आयुक्त :या पुलाचे काम बजेट मध्ये असेल तर कार्यवाही करता येईल.

मा.महपौर :राखीव बजेट आहे. त्यातून काम करता येईल. या पुलाचे अंदाजपत्रक तयार करावे.

श्रीमती स्वाती नागरे :माझ्या वार्डात स्मशानभुमी रस्त्यावरील सर्व लाईट बंद आहे. श्री.देशमुख यांना फोन केला तरी जागेवर येऊन पाहणी करीत नाही, काम होत नाही.

उपअभियंता(विदयुत) :उद्या सध्यांकाळ पर्यत लाईट चालू करण्यात येईल.

श्रीमती सीमा खरात :टीव्ही सेन्टर चौक ते हडको कॉर्नर रस्त्यातील ५० लाईट बंद आहे. संबंधीत ठेकेदारास केबल दिले जात नाही. अशी माहिती मिळाली.

मा.आयुक्त :ज्या ज्या लाईट बाबत अडचणी आहेत, दोन दिवसात व्हीजीट करून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विजय औताडे :एसबीओ शाळा, हर्सुल टी पॉईन्ट चौकात सिग्नल मंजूर झाले. परंतु बसविण्यात आलेले नाहीत. रामा हॉटेल चौकातील सिग्नल बंद करण्यात आले ते सध्या आणून बसविले तरी चालेल तसेच वार्डातील लाईट बंद आहे. ठेकेदारास केबल देत नाही. असी माहिती समोर आली आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :नागेश्वर वाडी कडे जाणारा निजामकालीन पुल मोळकळीस आला. तो नवीन बांधण्यात यावा.

मा.महापौर :सर्व पुलाचा सर्वे करण्याचे सुचना दिल्या आहेत व शासनास कळवून आवश्यक निधी यासाठी मागविण्यात येईल.

श्रीमती सुमित्रा हाळनोर :भाजीवाली बाई पुतळा ते संकल्प मंगल कार्यालय पर्यत रस्त्याचे काम अर्धवट राहिले आता या रस्त्यावर खड्डे झाले.

श्रीमती सायरा बानो :सन-२०१३ मध्ये मा.कोर्टाने स्वत:हून रिट याचिका दाखल करून घेतली व महाराष्ट्रातील ज्याही महापालिका असेल त्यांनी फुटपॉथ, खड्डे बुजविणे व इतर आवश्यक कामे करण्याची जबाबदारी आहे, नसता कार्यवाही करण्यात यईल असेल म्हटले होते. १३५ खड्डे बाबत चर्चा झाली. कार्यवाही का केली नाही?

मा.आयुक्त :शहरातील रस्त्यांची लांबी १२९३ कि.मी, डांबरी रस्ते ७४८, क्रॉक्रीट १८८, पेव्हर ब्लॉक १४४, खडी व कच्चे रस्ते २४२ कि.मी. मागिल तीन वर्षात मनपा निधीतून ५८.२४ कोटी निधी खर्च केला. इतर निधीतून २५ कोटी एकूण १२४.०६ कोटी खर्च केले. झोन निहाय खड्डे बुजविण्यासाठी टेंडर केले आहे. ३२ अंदाजपत्रक तयार केले. २-३ दिवसात काम होईल. भविष्यात १५० कोटीचे रस्त्याची कामे हाती घेणार आहे. चिकलठाणा एमआयडीसी भागातील रस्त्यांसाठी संबंधीत खात्याचे मा.सचिव येणार आहे. त्यांचेकडे १०० कोटीची मागणी करणार आहे.

श्री.राजू शिंदे :माझे वार्डात ३७ कोटीची डिफरचे रस्ते होते. त्यातील काही कामे रद्द केली व ४-५ कोटी बाकी होते. नवीन टेंडर करून काम करणार होते. या वार्डातून ६०-७० कोटी कराच्या माध्यमातून मिळतात. १४ रस्ते घेतले होते, चार रस्ते बाकी आहेत. त्या रस्त्याचे काम करणार की नाही?

मा.आयुक्त :रद्द केलेले काम होणार नाही, जसे उत्पन्न तसा खर्च करता येईल. विशेष बाब म्हणूनही पाच कोटी एकाच भागासाठी देता येत नाही. मागिल वर्षी मालमत्ता कराची वसुली ८४ कोटी एकाच वार्डात ५ कोटी दिले तर कामे कशी होणार

श्री.राजू शिंदे :मनपाची परिस्थिती अशीच राहिल, जे टेंडर मधील रक्कम बाकी आहे, त्यातून कामे करावी.

श्री.भगवान घडमोडे :मंजूर काम पुर्ण करावे. काम मंजूर झाले. नागरीकांना माहित असेल ते सदस्यांना काम केंव्हा होणार विचारतात. विशेष बाब म्हणून या वार्डातील काम करण्यात यावे.

मा.आयुक्त :वसुली वाढणार नाही, तोपर्यत काम होणार नाही.

श्री.राजू शिंदे :यापेक्षा कोणते उत्पन्न वाढणार आहे. काय नियोजन केले. जे उद्योजक आहे त्यांचेशी भेदभाव करीत आहात काय? किंवा माझेशी आकस बुध्दीने वागत आहात काय? शहरातील सर्व लोक तेथे काम करतात. मा.कोर्टात सुध्दा शपथपत्र दिले की कामे करणार आहे.

श्री.सय्यद मतीन :सर्व वार्डात समान निधी द्यावा.

श्री.दिलीप थोरात :ज्या भागात वसुली होते, तेथील पैसा तेथेच विकास कामासाठी खर्च करावा.

श्रीमतीसायरा बानो :मा.कोर्टात प्रकरण होते. तक्रारी घेणे बाबत वेबसाईट ओपन करावी असे म्हटले होते. केले काय? कोणते खड्डे बुजविले. पेपरला तसे माहिती द्यावी.

श्रीमती सत्यभामा शिंदे :माझ्या वार्डातील पाणीपुरवठा सुरळीत करावा.

मा.महापौर :ज्यांना प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही, तेच प्रश्न पुढच्या वेळी घेण्यात येईल.

शहर अभियंता :रस्त्याची लांबी १३०० कि.मी डांबरी ७००-८०० कि.मी.डांबरीकरण केलेले रस्ते ४-५ वर्षानंतर दुरूस्तीसाठी येतात. याचा अर्थ दर वर्षी किमान ३००-४०० कि.मी. रस्ते दुरूस्तीसाठी घेतले योग्य राहिल. अनेक रस्ते असे की, ७-८ वर्षापासून देखभाल दुरूस्ती केले नाही. ३००-४०० कि.मी रस्ते देखभाल दुरूस्ती करायचे झाल्यास दर वर्षी किमान १०० कोटी अपेक्षीत आहे. खड्डे पडण्याचे प्रमाण आणखी वाढतच आहे. समांतर व ड्रेनेजचे काम चालू आहे त्यामूळे खड्डे पडत आहे. पावसाळयात काही ठिकाणी काम करता येत नाही. काही रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहेत. एमएसआरडीसीचे आहते गुंठेवारीत मुरूम टाकला तर चिखल होतोच, वेळ लागत नाही.

(या वेळी आयुक्त म्हणून उपआयुक्त श्री. अयुब खान हे बसतात.)

जे पी इन्टरप्राईजेसच्या मार्फत ३० कोटीचे रस्ते हाती घेतले. जवळपास पुर्ण काम झाले त्यावर खड्डे होत नाही. आणखी १५० कोटीचे रस्ते करणार आहे. निविदा प्रक्रिया होत आहे. फंडची व्यवस्था करावी लागेल. त्याच बरोबर तात्पुरते खड्डे बुजविणेसाठी ३२ अंदाजपत्रक मंजूर केले आहे. गणपती आगमण होण्या अगोदर कामे सुरू होतील. दीड ते पावनेदोन कोटीचे रस्ते असेल.

श्री.भगवान घडमोडे :डांबर प्लॅन्टला किती खर्च लागाणार होता?

शहर अभियंता :डांबर प्लॅन्टचा विचार केला होता. परंतु असा विचार पुढे आला की, डांबर घ्यायचे व मनपाच्या यंत्रणेमार्फत खड्डे वर्षभर बुजवत राहणार तुलनात्मक तक्ता केला. डांबर प्लॅन्ट उभारणी, पुरवठा व जमीन खरेदी या गोष्टी कराव्या लागतील. माहिती घेतली असता, मांडकी वस्तीच्या बाजूला मनपाच्या हद्दी डांबर प्लॅन्ट करता येणार नाही असे कळाले. डांबर ल्पॅन्ट केला तर २.९४ कोटी रक्कम यंत्रणेसाठी २.३३ कोटी दरवर्षी चालविण्यासाठी खर्च २.०३ कोटी हे उभा करणेस अशा अडचणी होत्या. मा.महापौर, मा.उपमहापौर यांचेशी चर्चा झालेली आहे. त्यामूळे मधला मार्ग काढला की, मशीनरी विकत घ्यायची, सर्व वाहणे घेणार, डांबर मटेरियल घेणार, डिपार्टमेन्टली खड्डे बुजविणार आहे. डांबर प्लॅन्ट उभा करण्यासाठी टेंडर काढले. कुणी भरतच नाही. हायड्रोलिक टिप्पर घ्यायचे होते. चार वेळेस निविदा काढली. एकच आली. व्हायब्रेटर रोलर साठी निविदा काढली, एकच आली .जेसीबी २ तीसऱ्या वेळी तीन निविदा प्राप्त झाल्या वाटाघाटीसाठी आहे.

श्री.भगवान घडमोडे :९ प्रभागासाठी प्रत्येक ठिकणी ९ टिप्पर व इतर यंत्रणा कार्यान्वित करून डांबर ची वर्षभर कामे सतत चालू राहिल. अशी व्यवस्था करावी.

श्री.राजू शिंदे :नवीन रस्ते केले. दोन महिन्यात खराब होत आहे. साईड नाली असावी. दिनांक ३०-६-२०१६ रोजीच्या सभेत समांतर बाबत निर्णय घेतला. ती योजना चुकीची आहे अधिकारी यांनी चुकीचे काम केले. पैसे दिले चुकीचे दिले असे प्रशासनाचे म्हणणे होते म्हणून समांतर एजन्सी रद्य करण्याचा ठराव मंजूर केला.त्या एजन्सीने दोन खाते ओपन केले. समांतरने त्यांचा खर्च न करता महापालिकेचे पैसे घेतले. काम करीत गेले. या कंपनीने १०० टक्के मनपास लुटले असे म्हणणे होते. निर्णय देत असतांनाच कॅव्हेट दाखल करावे असे

सुचविले होते. परंतु केले नाही, आता कंपनीला स्टे मिळाला असे कळते. माहीती घ्यावी.

विधी सल्लागार :समांतर एजन्सी बाबत तीन्ही कोर्टात कॅव्हेट दाखल केले होते. त्यानंतर कंपनीने सेक्शन ६,९ अरबीट्रेशन ॲक्टनुसार जिल्हा न्यायालयात प्रकरण केले की, बँक गॅरन्टी जप्त करू नये व कोणतीही ॲक्शन घेऊ नये. त्यावेळेस मनपाचे वकील यांनी सुनावणीसाठी तयार आहोत असे म्हणने मांडले त्यावर सुनावणी झाली. परंतु मा.कोर्टाने बँक गॅरन्टी व ॲक्शन घेण्यास मनाई हुकूम दिला.कंपनीचा जो प्लॅन्ट जे वर्कींग आहे जागा ताब्यात आहे त्यावर कुठलीही कार्यवाही करू नये असे मुद्दे मांडले गेले होते अंतिम निकाल होत नाही. तोपर्यत कार्यवाही करू नये असे मा.कोर्टाने आदेशीत केले.

श्री.राजू शिंदे :महापालिकेच्या वकीलांनी काय मत मांडले?

विधी सल्लागार : सध्यस्थिती ठेका रद्द केलेला नव्हता चार तारखेला प्रकरण निघाले त्या दिवशी नोटीस तामील केली होती.नोटीस दिली मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले कळविले होते.आणि ॲबीट्रेशन सेक्शन ९ जे उपस्थित करीत आहे जिल्हा न्यायालया समोर हे प्रकरण चालू शकत नाही.पुर्ण ठेका रद्द झाल्या शिवाय सेक्शन ९ नुसार प्रकरण चालू शकत नाही.असे मत मांडले

श्री.राजू शिंदे :टर्मीनेट केलेच नव्हते, तर बँक गॅरन्टी जप्त करण्याचा विषय येत नव्हता.

विधी सल्लागार :यात स्पेशल कॉन्सिल म्हणून एसआर नेहरी व पॅनलवरील वकील श्री. पडोळे आहे.

श्री.राजू शिंदे :कंपनीला जशा पध्दतीने काम करायचे ते केले कॅव्हेट वेळेवर दाखल झाले नाही. मा.कोर्टाने त्यांना पैसे द्यावे असे म्हटले का?

विधी सल्लागार :कॅव्हेट दाखल केले होते. म्हणणे न ऐकता निकाल दिला. कंपनीला पैसे देणे संबंधीत प्रकरण या विभागाकडून हाताळले नाही. पैसे द्यावे असेही मा.कोर्टाने सांगितलेले नाही व टर्मीनेट करू नका असेही सांगितले नाही.

श्री.राजू शिंदे :कंपनीला टर्मीनेट करू शकतो, बँक गॅरन्टी कोर्टाच्या आदेशान्वये जप्त करू शकत नाही.

विधी सल्लागार :प्रकरण दाखल झाले होते. त्यानंतर टर्मीनेटची कार्यवाही सुरू केली.

श्री.राजू शिंदे :समांतर बाबत निर्णय घेतला. त्या प्रशासन सांगते की, एकतर्फी पैसे देत गेलो त्याचे काम बंद केले पाहिजे. पैसे देत गेलो, आता देऊ नये असे असतांना पुन्हा कंपनीस ८.३४ कोटी अदा केले. या सभेची परवानगी घेतली नाही, पैसे देऊनही काम करीत नाही. घाण पाणी येते, तक्रार करतो दुरूस्तीचे काम होत नाही, असे असतांना पैसे कशासाठी दिले. निर्णय घेऊन ४० दिवस झाले मनपाने काय पर्यायी व्यवस्था केली.

शहर अभियंता :एओजी चे पैसे दिले असेल त्यात कंपनीचे इतर कामाचा खर्च असतो.

उपअभियंता :दिनांक ३०-६-१६ रोजी निर्णय घेतल्यानंतर कंपनीला नोटीस दिली. ३४ नियमानुसार एक महिनयाची नोटीस द्यावी लागते. ४ जुलैला नोटीस दिली. त्याची मुदत ४ ऑगस्टला संपली. होती नंतर कोर्ट प्रकरण झाले. कन्सेशन ॲग्रीमेन्ट नुसार पैसे दिले आहे.

मा.महापौर :समांतर करार रद्द केला. त्यानंतर पैसे दिले गेले. सभेची मान्यतेची आवश्यकता नव्हती का?

श्री.राजू शिदे :समांतरचा करार रद्द केला, त्यानंतर पैसे देण्याची गरज नव्हती. नसता त्याच दिवशी असे सांगायला पाहिजे होते की, मागिल रक्कम कंपनीला देणे आहे. समांतरच्या बाजूने अधिकारी बोलतात. यात मोठा भ्रष्टाचार ३० तारखेच्या नंतर झाला. ५ कोटीचे व्यवहार सर्व मॅनेज करून झाले. पेमेंन्ट दिले. स.पदाधिकारी यांना सांगितले नाही. कोर्टात प्रकरण न्यायचे. काही तरी ऑर्डर करून कंपनीला फुकट पैसे द्यायचे काम होत आहे. कंपनी जाणार नाही, मनपाही काम करणार नाही. नागरीकांना वेठीस धरण्याचे काम होत अहे.

मा.महापौर :पैसे कोणत्या नियमानुसार दिले पुढील सभेत माहिती द्यावी.

श्री.राजू शिंदे :जी कामे प्रलंबीत आहेत ती कंपनी करीत नाही. महापालिका काम करेल असे मा.आयुक्तांनीच सांगितले होते. आता कामे का होत नाही?

श्री.भगवान घडमोडे :माझे वार्डात घाण पाणी येते. पाईप लाईन अपुर्ण आहे. पत्र दिले कार्यवाही केली नाही.

उपअभियंता :कंपनीच कामे करणार आहे. तक्रारी आल्यानंतर कंपनीला कळविले जाते. काम केले नाही तर मनपा काम करील व एओजी मधून पैसे कपात केले जाईल. कंपनीला असे कळविले आहे.

श्री.गोकुळसिंग मलके :माझ्या वार्डात लिकिजेस, खराब पाणी येत होते. नवीन पाईप टाकले. अद्याप लाईन जोडली नाही.

मा.महापौर :उद्याच या ठिकाणी कर्मचारी पाठवून कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :पाण्याविषयी तक्रार घेऊन गेलो. काम होत नाही म्हणून आयुक्तांकडे तक्रार मांडली. मा.आयुक्तांनी संबंधीत अधिकारी यांना आदेशीत केले. संबंधीत अधिकारी यांचेकडे गेलो असतांना, आपण धमकी देत आहात. गुन्हा दाखल करील. असे बोलले. एका ठिकाणी पाणी लिकिजेस होते. मोठ्या प्रमाणात पाणी वाहते आहे. पाणी वाया जाते. ७५ मीटरची लाईन मंजूर झाली. आणखी पाईपची आवश्यकता होती. संमातर वाले काम करीत नाही. मनपाचे अधिकारीही काम करीत नाही. तर आम्ही कुणाकडे जायचे.

मा.महापौर :यात शहर अभियंता यांनी लक्षत द्यावे कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रमांक ४९३:-</u>** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या सादर केलेल्या आढावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९४:-** **(दिनांक २०.११.२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील (का.प.क्र.१०) स्थगीत ठेवण्यात आलेला विषय क्र.२२५)**
**(कार्यकारी अभियंता,युआयडीएसएसएमटी-मलनिःसारण)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाने माहे जुन २०१५ च्या मार्गदर्शक तत्वानुसार देशातील प्रत्येक परीवाराला प्रचलित निकषानुसार पाणीपुरवठा,सार्वजनिक स्वच्छतेसाठी मलनिःसारण व मलव्यवस्थापन व्यवस्था, स्ट्रॉम वॉटर गटार,फुटपाथ,सुस्थितीतील सार्वजनिक परीवहन व्यवस्था,वाहनतळ इत्यादी तसेच प्रामुख्याने लहान मुलांसाठी हरीत उद्याने,मनोरंजन पार्क व सलग्न अशा बाबी ज्यामुळे लहान मुलांचे मनोरंजन व शैक्षणिक/मानसिक ज्ञानात संवर्धन होईल पर्यायाने देशातील प्रत्येक परीवाराला चांगल्या प्रकारची सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देता येईल या करीता अटल नवीकरण आणि शहरी परीवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation\and Urban Transformation (AMRUT) योजना सुरु केलेली आहे.

सदरील योजने अंतर्गत सर्व्हिस लेव्हल बेंचमार्कींग अंतर्गत करावयाच्या सुधारणा वाढविणे व नागरीकांना मुलभुत व भौतिक सुविधेसोबतचा वरीलनुसारच्या सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देणे ह्या संकल्पनेचा प्रामुख्याने अंतर्भाव करण्यात आलेला आहे. आर्थिक वर्ष सन २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षाच्या कालावधीसाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे.

अटल नवीकरण आणि शहरी परीवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation\and Urban Transformation (AMRUT) अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेची लोकसंख्या ही १० लक्ष पेक्षा जास्तीची असल्याने राज्य शासनाच्या मंत्रिमंडळ बैठक क्रमांक ४९ दिनांक ३०.०९.२०१५ मधिल अ.क्रं. ३ च्या निर्णयानुसार तसेच केंद्र शासनाकडील वित्तीय आकृतीबंधानुसार खालील प्रमाणे केंद्र/राज्य व महानगरपालिकेचा हिस्सा एकुण प्रकल्प किमंती अंतर्गत राहणार आहे.

भविष्यात funding pattern मध्ये बदल झाल्यास त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

| केंद्र शासन अनुदान (एकुण प्रकल्प किमंतीच्या) | राज्य शासन अनुदान (एकुण प्रकल्प किमंतीच्या) | महानगरपालिकेचा हिस्सा (एकुण प्रकल्प किमंतीच्या) |
|---|---|---|
| ३३.३३% | १६.६७% | ५०% |

सदरील योजने अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राष्ट्रीय/राज्य व शहरस्तरावरील समितीची रचना केंद्र शासनाने योजनेतील कामांसंदर्भाने खालील नुसार तयार केलेली आहे.

| राष्ट्रीय स्तरावरील समिती | राज्य स्तरावरील समिती | शहर स्तरावरील समिती |
|---|---|---|
| अध्यक्ष-सचिव (शहरी विकास मंत्रालय)<br>सदस्य सचिव – मिशन निदेशक (शहरी विकास मंत्रालय) | अध्यक्ष (मुख्य सचिव)<br>सदस्य सचिव (प्रधान सचिव शहरी विकास) | अध्यक्ष- आयुक्त, महानगरपालिका |

तसेच सदरील योजने अंतर्गत ज्या ज्या विभागाचे विस्तृत प्रकल्प प्रस्ताव महानगरपालिके मार्फत तयार करण्यात येणार आहे.अशा सर्व विस्तृत प्रकल्प प्रस्तावांचे मुल्यांकन करणे करीता खालील नुसारची समिती तयार करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष – प्रधान सचिव(शहरी विकास) /सचिव(शहरी विकास) | सदस्य सचिव - मुख्य अभियंता (शहरी पाणीपुरवठा व मलनिःसारण विभाग) व परीवहन विभागा करीता त्या विभागाचे कार्यकारी निदेशक |

वरील प्रमाणे योजने मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश राज्य शासनाने केलेला असल्याने महानगरपालिके मार्फत विविध विकास कामांचे विविध प्रकारचे विस्तृत प्रकल्प प्रस्ताव केंद्र

व राज्य शासन अनुदान मिळणे करीता व शहरातील नागरीकांना चांगल्या प्रकारच्या सोई सुविधा मिळणे करीता तयार करावयाचे आहे.

केंद्र शासनाच्या अटल नवीकरण आणि शहरी परीवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation\and Urban Transformation (AMRUT) योजनेच्या विविध मार्गदर्शक तत्वानुसारची कार्यवाही करणे,केंद्र व राज्य शासनाकडील शासन परीपत्रक/शासन निर्णय/सुचनां प्रमाणे वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करणे,योजनेतील विहीत प्रपत्रानुसारची सविस्तर माहिती शासनास सादर करणे, महानगरपालिकेस करावयाच्या आवश्यक सुधारणांबाबतची कार्यवाही करणे,महानगरपालिकेच्या या योजनेतील विविध प्रकल्प प्रस्तांवाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे,योजनेच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यक आर्थिक तजविज करणे इत्यादी बाबीं करीता आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्राधिकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या अटल नवीकरण आणि शहरी परीवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation\and Urban Transformation (AMRUT) योजनेच्या विविध मार्गदर्शक तत्वानुसारची कार्यवाही करणे,केंद्र व राज्य शासनाकडील शासन परीपत्रक/शासन निर्णय/सुचनां प्रमाणे वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करणे,योजनेतील विहीत प्रपत्रानुसारची सविस्तर माहिती शासनास सादर करणे, महानगरपालिकेस करावयाच्या आवश्यक सुधारणांबाबतची कार्यवाही करणे,महानगरपालिकेच्या या योजनेतील विविध प्रकल्प प्रस्तांवाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे,योजनेच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यक आर्थिक तजविज करणे इत्यादी बाबीं करीता आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना नियमाप्रमाणे प्राधिकृत करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९५:-** **(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका क्षेत्र अंतर्गत वॉर्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी, शांतीपूरा,न्यु नंदनवन कॉलनी, भुजबळ नगर तसेच शिवपुरी भागात ५०% पेक्षा जास्त प्रमाणात दलित वस्ती अधिकृत/अनधिकृत रित्या विकसीत झालेली आहे. सदर वसाहती साधारणत: १५ ते २० वर्षापुर्वीच्या असून वसाहतीतील काही भागांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे सदरील वसाहतीत राहणारे नागरीक टँकर व बोरवेलद्वारे पाण्याची गरज भागवितात. त्यामुळे काही भागांमध्ये पाणी पुरवठा सुधारणा करणे आवश्यक आहे. वसाहतीमधील काही भाग हा डोंगरालगत विकसीत झालेला असून परिसरामधील बोरवेलचा पाणीसाठा कमी झालेला आहे. संबंधीत वॉर्डाच्या स.नगरसेविका यांनी उपरोक्त परिसराकरीता नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी टाकण्याबाबत मागणी केली आहे. तसेच दिनांक १४.०९.२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१३९ अंतर्गत शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रभाग क्र.१७ येथील दलित बहुल वसाहतींचा विकास होणेकरीता प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठविण्यास मंजुरी प्रदान झालेली आहे.त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुचि सन २०१२-१३ नुसार रक्कम रुपये ६०,०१,४५२/- किंमतीचे अंदाजपत्रक व प्रस्ताव निधी उपलब्धते करीता मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना दिनांक १५.०२.२०१६ रोजी सादर केला होता. सदर प्रस्तावाला मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पत्र क्र.प्र.मा.क्र.२०१६/नपाप्र/नागरी दलित वस्ती/मनपा/प्र.मा./

कावि/३५७ दिनांक १३.०४.२०१६ अन्वये रुपये ६०,०१,४५२/- किंमतीच्या कामाला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

करीता उपरोक्त सर्व बाबी पाहता वर नमुद केल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १७ नंदनवन कॉलनी, शांतीपुरा व संलग्न परिसरात जलवाहीनी टाकण्याच्या रुपये ६०,०१,४५२/- किंमतीच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावास मान्यता प्रदान व्हावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. १७ नंदनवन कॉलनी, शांतीपुरा व संलग्न परिसरात जलवाहीनी टाकण्याच्या रुपये ६०,०१,४५२/- किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८२ अंबिकानगर व संतोषी मातानगर अंतर्गत विविध भागातील रस्ते खराब झालेले आहेत. या भागात सर्वात जास्त गरीब व हातावर काम करणारे नागरीक राहतात. या भागात अनुसूचित जातीचे सुमारे ७०% पेक्षा जास्त नागरीक आहेत. या भागातील रस्ते अत्यंत खराब झालेले असल्याने परिसरातील नागरीकांची अत्यंत गैरसोय होत आहे.

करीता या भागातील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रेटीकरण करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २ कोटी आवश्यक आहे. करीता सदरील कामे करण्यासाठीचा दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रकरणी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्या करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप **अनुमोदक:-**श्रीमती अनिता मोहन साळवे

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८२ अंबिकानगर व संतोषी मातानगर अंतर्गत रस्त्याचे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट कॉंक्रेटीकरण करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २ कोटी निधी प्राप्त होण्यासाठी नियमाप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४९७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व आरोग्य केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी ॲक्वागार्ड लावणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-** श्री.कमलाकर शामराव जगताप

श्री.अब्दुल नाईकवाडी :हॉस्पीटलमध्ये साफसफाई होत नाही फवारणी करीत नाही तेथे खर्च करण्यापुर्वी सर्व सुविधा द्याव्यात. त्यानंतर या बाबत विचार करावा.

मा.महापौर :तुर्त विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास तुर्त स्थगिती देण्यात आली.

**विषय क्रमांक ४९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४ गजानन नगर येथे ७५% नागरीक दलित वस्ती, गरीब कुटूंबातील असून या भागामध्ये लोकसंख्या जवळपास ८ ते १० हजार असून तेथील नागरीक मुलभूत सुविधेपासून वंचित आहेत.

ड्रेनेज लाईन, पाण्याची पाईपलाईन, विद्युतखांब या सारख्या त्या ठिकाणी अनेक समस्या आहेत. करीता शासनाकडून दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत २ कोटी रुपये मंजुर करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-** श्री.कमलाकर शामराव जगताप

मा.महापौर :विषय मंजुर. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४ गजानन नगर येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत ड्रेनेज लाईन, पाण्याची पाईपलाईन, विद्युतखांब अशा विविध विकास कामासाठी र.रु.२ कोटी निधी उपलब्ध करून देण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४९९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीत ३० दवाखाने असून ५ दवाखाने रात्री व दिवसा चालु असतात. त्या दवाखान्यामध्ये कर्मचारी महिला असून रात्रीच्या वेळेस कोणत्याही प्रकारचे पेशन्ट येऊ शकतात. ते रात्रीच्या वेळेस कर्मचाऱ्यांसोबत मोठ्या आवाजात बोलतात. तसेच आपल्या दवाखान्यामध्ये लाखो रुपयांची औषधी असते. त्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा व दवाखान्याची सुरक्षा यासाठी आपण रात्रीच्या वेळेस सुरक्षा गार्ड देण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

खालील पाच रुग्णालयाची नावे :-

१) महानगरपालिका रुग्णालय, सिडको एन-८,
२) महानगरपालिका रुग्णालय, सिडको एन-११,
३) महानगरपालिका रुग्णालय, कैसर कॉलनी,
४) महानगरपालिका रुग्णालय, सिल्कमिल कॉलनी,
५) महानगरपालिका रुग्णालय, बन्सीलाल नगर,

**सुचक:-** श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-** श्री.कमलाकर शामराव जगताप

श्री.भगवान घडमोडे :चिकलठाणा आरोग्य केंद्राचा यात समावेश करावा.

मा.महापौर :दुरूस्तीसह विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या खालील दवाखान्यामध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा व दवाखान्याची सुरक्षा यासाठी रात्रीच्या वेळेस सुरक्षा गार्ड देण्यास मंजुरी देण्यात येते.

१) महानगरपालिका रुग्णालय, सिडको एन-८,
२) महानगरपालिका रुग्णालय, सिडको एन-११,
३) महानगरपालिका रुग्णालय, कैसर कॉलनी,
४) महानगरपालिका रुग्णालय, सिल्कमिल कॉलनी,
५) महानगरपालिका रुग्णालय, बन्सीलाल नगर,
६) महानगरपालिका चिकलठाणा आरोग्य केंद्र.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आपल्या औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या TDR धोरण लागू आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टिने एक अत्यंत महत्वपुर्ण धोरणात्मक निर्णय घेण्याच्या उद्देशाने खालील प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

आजपर्यंत महानगरपालिकेने नागरीकांच्या हिताच्या दृष्टिने नागरीकांसाठी सार्वजनिक वापरांसाठी अनेक डी.पी.रस्त्यांचे, आरक्षित भुखंडाचे रोखीने नियमानुसार कार्यवाही करून भुसंपादन केलेले आहे.पर्यायाने त्याची मालकी आज महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेची कितीतरी कोटी रुपयांची गुंतवणूक या सर्व भुखंड खरेदी प्रक्रियेमुळे झालेली असतांना अशा प्रकारच्या सर्व भुखंडाचे क्षेत्राचे मुल्यमापन करून महानगरपालिकेची स्वतंत्र TDR बँक उघडून त्यामध्ये TDR जमा करुन त्याचे रुपांतर करून सदरील TDR महानगरपालिकेने जर ठरविलेल्या दराने विक्रीसाठी काढला तर निश्चीतपणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होऊ शकते.

अशा प्रकारचे धोरण ठरवित असतांना सदरील प्रकरणांमध्ये कायदेविषयक सल्ला,तज्ञांची समिती व तिचा अहवाल तसेच सध्या अस्तित्वात असलेले महानगरपालिकेच्या TDR धोरणाच्या नियमामध्ये बदल करण्यासाठी मा.राज्य शासनाची परवानगी घेणेसुध्दा आवश्यक आहे.प्राप्त माहितीनुसार अशा प्रकारचे धोरण राज्यात कोठेही नाही. परंतु प्रयत्न केल्यास मा.राज्य शासनाकडून परवानगी मिळण्याची सदरील प्रस्ताव मंजुरीची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही.

करीता उपरोक्त प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेसाठी व मंजुरीस्तव सादर. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेने डी.पी.रस्त्यांचे, आरक्षित भुखंडाचे रोखीने नियमानुसार कार्यवाही करून भुसंपादन केलेले असुन या क्षेत्राचे मुल्यमापन करून महानगरपालिकेची स्वतंत्र TDR बँक उघडून त्यामध्ये TDR जमा करुन त्याचे रुपांतर करून सदरील TDR महानगरपालिकेने ठरविलेल्या दराने विक्री केल्यास उत्पन्नास वाढ होईल यासाठी धोरण ठरविण्याकरीता कायदेविषयक सल्ला, तज्ञांची समिती व तिचा अहवाल तसेच सध्या अस्तित्वात असलेले महानगरपालिकेच्या TDR धोरणाच्या नियमामध्ये बदल करण्यासाठी मा.राज्य शासनाची परवानगी घेण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याकरीता योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विटखेडा येथील महानगरपालिकेच्या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग सुरू आहेत. या शाळेत गरीब, सर्वसामान्य घराण्यातील नागरीकांची मुले शिक्षण घेण्यासाठी येतात. सातवीच्या पुढे वर्ग नसल्यामुळे ते आपल्या मुलांना पुढील शिक्षण देऊ शकत नाहीत. करीता विटखेडा गावातील महानगरपालिकेच्या शाळेत पुढील ८ वी ते १० वीचे वर्ग सुरू करण्यात यावेत.

तसेच या ठिकाणी शिक्षकांची नियुक्ती आवश्यकतेनुसार फर्निचर,शालेय साहित्य पुरविण्यात यावे व सर्व सुविधानुसार ८ वी ते १० वीचे वर्ग सुरू करण्याची कार्यवाही नियमानुसार करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-** श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

मा.महापौर :विषय मंजुर.नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विटखेडा येथील महानगरपालिकेच्या शाळेत ८ वी ते १० वीचे वर्ग सुरू करुन शिक्षकांची नियुक्ती, आवश्यकतेनुसार फर्निचर, शालेय साहित्य नियमानुसार पुरविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बालाजी अपार्टमेंट ते ॲड.डंख यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याला स्वर्गीय विश्वनाथ अप्पा संगशेट्टी मार्ग असे नामकरण करण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे **अनुमोदक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

मा.महापौर :विषय मंजुर.नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बालाजी अपार्टमेंट ते ॲड.डंख यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याला स्वर्गीय विश्वनाथ अप्पा संगशेट्टी मार्ग असे नाव देण्यास नियमानुसार मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ करीता मा.स्थायी समितीने शिफारस केलेल्या कामांची यादीतील पान क्र.११ SCR.Ward.B वरील अनुक्रमांक १४ वर वॉर्ड क्र. ४० विश्वकर्मा हौ.सोसायटी एन-८ ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे ह्या कामासाठी अर्थसंकल्पीय तरतुद रक्कम रुपये २० लक्ष ठेवण्यात आली आहे. तरी सदरील तरतुद माझ्या वॉर्डात

१. गणेश हॉ.सोसायटी एन-८ रु.१५.०० लक्ष
२. सद्‌गुरू हॉ.सोसायटी एन-८ रु.५.०० लक्ष असे वळती करून देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी **अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.दिलीप गंगाधर थोरात.

मा.महापौर :-प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-१७ करीता मा.स्थायी समितीने शिफारस केलेल्या कामांची यादीतील पान क्र.११ SCR.Ward.B वरील अनुक्रमांक १४ वर वॉर्ड क्र. ४० विश्वकर्मा हौ.सोसायटी एन-८ ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाऐवजी सदरील तरतुद गणेश हॉ.सोसायटी एन-८, रु.१५.०० लक्ष तसेच सद्‌गुरू हॉ.सोसायटी एन-८ रु.५.०० लक्ष या कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाने आगामी २०१७ हे वर्ष 'पर्यटन वर्ष' म्हणुन जाहीर केलेले असून औरंगाबाद जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणुन महाराष्ट्र शासनाने या अगोदरच घोषित केलेला असून शहरातील सर्व पर्यटन स्थळे यांना जोडणारे रस्ते हे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटने बनविणे व त्यावर LED लाईटस्/सोलर चे नवीन पोल उभारणे करीता महानगरपालिकेला रु.२० कोटी अनुदान हे याच आर्थिक वर्षात देण्याचा शासनाने निर्णय जाहीर केलेला आहे. केवळ महानगरपालिके कडून तसा ठोस अहवाल व जागेसह प्रस्ताव केला नसल्याने ती रक्कम वर्ग झालेली नाही.

शहरातील बीबी का मकबरा ते औरंगाबाद लेणी यांना जोडणारा महानगरपालिकेचा अरुंद रस्ता हा शासनाकडून २००१ साली मंजुर असलेल्या विकास योजना आराखड्यानुसार २४ मी.रुंद विकास योजना रस्ता असा प्रस्तावित असून त्यात महानगरपालिकेतर्फे रुंदीकरण केवळ निपटनिरंजनच्या गेटपर्यंत झालेले असून त्या पूढील महानगरपालिकेचा लेणीकडे जाणारा रस्ता केवळ २० फुट असल्याने पर्यटकांचे ४ चाकी वाहने उत्तरेकडे लेणी पर्यंत जाऊ शकत नाहीत. त्यामुळे जगप्रसिध्द लेण्यांना पर्यटक आणि शहरातील लक्षावधी बौध्दधर्मीय भेट देऊ शकत नाही. मंजूर डी.पी.प्लॅन नुसार या ठिकाणी या अरुंद मनपाचे रस्त्याचे तो २४ मी. (८० फुट) रुंदीकरण व कॉँक्रीटीकरण महानगरपालिकेने करणे करीता, आवश्यक शासनाचे धोरण नुसार अस्तीत्वातील रस्ता डिमार्केशन नुसार उर्वरित बाधीत खासगी व शासकीय जागेचा भूसंपादन अधिग्रहण महानगरपालिकेने सर्वप्रथम करणे जरुरी असून आणि त्यास 'शहरातील पर्यटन स्थळे जोडणारे रस्ते विकास' करीता प्रकल्प अहवाल बनवून विहित मार्गाने शासनाकडे प्रस्ताव सप्टेंबर-२०१६ पर्यंत पाठविणे जरुरी आहे. करीता त्या करिता रस्ता रुंदीकरणाने बाधित जागेचा त्वरित टीडीआर देऊन अधिग्रहण करणे व या पहाडसिंगपूरा येथील २४ मी.रुंद (उत्तर-दक्षिण) मनपा विकास योजना रस्त्याचे प्रस्तावित कॉँक्रीटीकरण, त्या रस्त्यालगत LED लाईटपोल चे अंदाजपत्रक, प्रकल्प अहवाल बनविणे व शासनाकडे आणि मा.पालकमंत्री यांचेकडे त्याचा निधी मिळवणे करीता पाठपूरावा करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-** श्री.विकास रतनलाल जैन

श्री.सुभाष शेजवळ : यात २० कोटीची मान्यता घेतली आहे महापालिकेला खर्चाचा बोजा पडणार नाही.त्यासाठी मा.आयुक्तांनी त्या संचिकेचा पाठपुरावा करावा.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने तातडीने पत्र व्यवहार करुन हा निधी मिळण्यासाठी कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाने आगामी २०१७ हे वर्ष 'पर्यटन वर्ष' म्हणुन जाहीर केलेले असून औरंगाबाद जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणुन महाराष्ट्र शासनाने घोषित केलेला असून शहरातील पर्यटन स्थळे यांना जोडणारे रस्ते करीता महानगरपालिकेला रु.२० कोटी अनुदान शासनाने जाहीर केलेले असल्याने बीबी का मकबरा ते औरंगाबाद लेणी यांना जोडणारा रस्ता रुंदीकरणाने बाधित जागेचा त्वरित टीडीआर देऊन जागेचे भुसंपान अधिग्रहन करणे तसेच पहाडसिंगपूरा येथील २४ मी.रुंद विकास योजना रस्त्याचे प्रस्तावित कॉँक्रीटीकरण, त्या रस्त्यालगत LED लाईटपोल चे अंदाजपत्रक, प्रकल्प अहवाल बनविणे व शासनाकडे, मा.पालकमंत्री यांचेकडे निधी मिळवण्याकरीता पाठपूरावा करण्यासाठी अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५०५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्रमांक-२ भगतसिंग वॉर्डामध्ये जवळपास ७५ टक्के दलित समाजाचे रहिवासी राहत असल्याने शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे केल्यास त्यांचे राहणीमान व दैनंदिन मुलभूत सुविधा देण्यास खालील कामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्या कामासाठी निधी मिळविण्यास शासनाकडे शिफारस करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे दिक्षाभुमीनगर मध्ये विविध गल्ल्यांत ट्रिमीक्स कॉँक्रेटिंग करणे- रक्कम रुपये ३० लाख.

२. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे वाघुळे गल्ल्यांमध्ये विविध ठिकाणी ट्रिमीक्स कॉंक्रेटिंग करणे- रक्कम रुपये ३० लाख.
३. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे दिक्षाभुमीनगर मध्ये विविध गल्ल्यांत विविध ठिकाणी विद्युत पोल सहित लाईट फिटींग लावणे- रक्कम रुपये ३० लाख.
४. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे वाघुळे गल्ल्यांमध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल सहित लाईट फिटींग लावणे- रक्कम रुपये ३० लाख.

**सुचक:-** श्री.बन्सी ग्यानु जाधव **अनुमोदक:-** श्री.कमलाकर शामराव जगताप

मा.महापौर :विषय मंजुर.नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्रमांक-२ भगतसिंग वॉर्डामध्ये खालील विकास कामे करण्यासाठी निधी उपब्लध होणेकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे दिक्षाभुमीनगर मध्ये विविध गल्ल्यांत ट्रिमीक्स कॉंक्रेटिंग करणे- रक्कम रुपये ३० लाख.
२. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे वाघुळे गल्ल्यांमध्ये विविध ठिकाणी ट्रिमीक्स कॉंक्रेटिंग करणे- रक्कम रुपये ३० लाख.
३. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे दिक्षाभुमीनगर मध्ये विविध गल्ल्यांत विविध ठिकाणी विद्युत पोल सहित लाईट फिटींग लावणे- रक्कम रुपये ३० लाख.
४. वॉर्ड क्रमांक-१ भगतसिंगनगर हर्सुल गाव येथे वाघुळे गल्ल्यांमध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल सहित लाईट फिटींग लावणे- रक्कम रुपये ३० लाख.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२१, बुढ्ढीलाईन मध्ये कबाडीपुरा हा मोहल्ला आहे. परंतु कबाडीपुरा हे नाव अतिशय विचीत्र व खराब आहे. कारण कबाड याचा अर्थ घाण, कचरा असा होतो. त्यामुळे सदरील नाव हे ऐतिहासीक अशा औरंगाबाद शहरातील एखाद्या मोहल्ल्यास शोभुन दिसत नाही. कबाडीपुरा या मोहल्ल्यात हजरत शाह जमाल (रहे.) यांची दर्गा मागील ५०० वर्षांपासून अस्तित्वात असून ऐतिहासीक औरंगाबाद शहरातूनच नव्हे तर संपुर्ण मराठवाड्यातून येथे भाविक दर्शनासाठी येतात. म्हणून कबाडीपुरा या मोहल्ल्यातील सर्व रहिवासीयांच्या मागणीनुसार कबाडीपुरा मोहल्ल्याचे नाव बदलून हजरत शाह जमाल (रहे.) असे ठेवण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-** श्री.गंगाधर नामदेव ढगे, श्रीमती खान सायराबानो अजमल, श्री.खान इरशाद इब्राहीम

मा.महापौर :या वार्डात निवडणूक होत आहे त्यामुळे या प्रस्तावास तुर्त स्थगिती देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास तुर्त स्थगिती देण्यात आली.

**विषय क्रमांक ५०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९० राजनगर, मुकूंदनगर अंतर्गत विविध भागात अद्यापपर्यंत रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही. सदरील वॉर्ड हा नवीन वॉर्ड आहे. या भागात सर्वात

जास्त गरीब व हातावर काम करणारे नागरीक राहतात. या भागात अनुसूचि जातीचे सुमारे ८०% पेक्षा जास्त नागरीक आहेत. या भागात अद्याप महानगरपालिकेने कोणत्याच सुविधा दिलेल्या नाहीत. या भागात रस्ते व ड्रेनेज लाईन नसल्याने परिसरातील नागरीकांची अत्यंत गैरसोय होत आहे.

करीता या भागातील रस्ते खडीकरण व मजबुतीकरण करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २ कोटी तसेच नवीन ड्रेनेज लाईन टाकणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २ कोटी आवश्यक आहे.

करीता सदरील कामे करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रकरणी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्या करीता सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती अनिता मोहन साळवे **अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९० राजनगर, मुकूंदनगर भागातील रस्त्यांचे खडीकरण व मजबुतीकरण करणेसाठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रक्कम रुपये २.०० कोटी व नवीन ड्रेनेज लाईन टाकणेसाठी रक्कम रुपये २.०० कोटी इतका निधी प्राप्त होणेसाठी नियमाप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५०८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३ मधील मनपा अर्थसंकल्प २०१६-२०१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा. म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR-Ward-A-P. No-7 अ.क्र.२ | वॉर्ड क्र.३ अंतर्गत मनपाच्या खुल्या जागा विकसीत करणे आर्थिक तरतुद १० लक्ष | वॉर्ड क्र.३एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटिकरण करणे. या कामासाठी सदरील १० लक्ष रुपयाचा निधी वळती करण्यात यावा. |

**सुचक:-** श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

**अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३ मधील मनपा अर्थसंकल्प २०१६-२०१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR-Ward-A-P. No-7 अ.क्र.२ | वॉर्ड क्र.३ अंतर्गत मनपाच्या खुल्या जागा विकसीत करणे आर्थिक तरतुद १० लक्ष | वॉर्ड क्र.३,एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटिकरण करणे. या कामासाठी सदरील १० लक्ष रुपयाचा निधी वळती करण्यात यावा. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.३ एकतानगर वसाहतीमध्ये जवळपास ७५ टक्के दलित/अल्पसंख्यांक समाजाचे रहिवासी राहत असल्याने शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामे केल्यास त्याचे राहणीमान उंचावण्यासाठी व दैनंदिन मुलभूत सुविधा देण्यासाठी खालील कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर कामासाठी निधी मिळविण्यास शासनाकडे शिफारस करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.३, एकतानगर भागात विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे
२. वॉर्ड क्र.३ जहांगीर कॉलनी भागात विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे.
३. वॉर्ड क्र.३मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.

**सुचक:-** श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे **अनुमोदक:-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.३ एकतानगर वसाहतीमध्ये खालील कामे करण्यासाठी नियमाप्रमाणे निधी मिळविण्याकरीता शासनाकडे शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.३, एकतानगर भागात विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे
२. वॉर्ड क्र.३ जहांगीर कॉलनी भागात विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे.
३. वॉर्ड क्र.३मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१११ प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथे स्मशान भुमीच्या बाजुला महानगरपालिकेची मोकळी जागा असून त्या जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. सदरील जागा बाजार भावाप्रमाणे करोडो रुपयांची असल्याने या जागेवर नागरीकांच्या सोंईसाठी व गरीब रहिवासीयांना शिक्षण मिळावे म्हणुन या ठिकाणी महानगरपालिकेची प्राथमिक शाळा बांधण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सलीमा बाबुभाई कुरैशी **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी, श्रीमती साजेदा सईद फारूकी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा येथील स्मशान भुमीच्या बाजुला असलेल्या महानगरपालिकेची मोकळ्या जागेवर नियमाप्रमाणे महानगरपालिकेची प्राथमिक शाळा बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१११ प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथे कब्रस्तानाच्या बाजुला महानगरपालिकेची मोकळी जागा असून त्या जागेवर नागरीकांच्या सोईसाठी सार्वजनिक मंगल कार्यालय बांधण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**श्रीमती सलीमा बाबुभाई कुरैशी **अनुमोदकः-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी, श्रीमती साजेदा सईद फारूकी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा येथे कब्रस्तानाच्या बाजुला असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेवर नियमाप्रमाणे सार्वजनिक मंगल कार्यालय बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२६ अंतर्गत नेहरुनगर एएमसी हॉस्पीटल मागे श्री.जफर खान यांच्या घरापासून ते श्री.पठाण साहेब यांच्या घरापर्यंत जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन टाकणे असे सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेत पान क्र.SCR-Ward-C.P.No.२४ वर अ.क्र.१३ वर रक्कम ३ लाख रुपयाची तरतुद उपलब्ध आहे.

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.२६ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची कामे करण्यासाठी रक्कम रुपये ३ लाख वळती करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती शेख नरगीस सलिम **अनुमोदकः-** श्री.सिद्दीकी नासेर तकियोद्दीन

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२६ अंतर्गत नेहरुनगर एएमसी हॉस्पीटल मागे श्री.जफर खान यांच्या घरापासून ते श्री.पठाण साहेब यांच्या घरापर्यंत जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन टाकणे असे सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेत पान क्र.SCR-Ward-C.P.No.२४ वर अ.क्र.१३ वर रक्कम ३ लाख रुपयाची तरतुद उपलब्ध आहे. या कामाऐवजी वॉर्ड क्र.२६ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची कामे करण्यासाठी रक्कम रुपये ३ लाख नियमाप्रमाणे वळती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील ज्येष्ठ नागरीक सामाजिक कार्यकर्ता व गोर-गरीबांसाठी अहोरात्र परिश्रम करणारे गरीब लोकांना लग्नासाठी, शिक्षणासाठी अनाथ आश्रमासाठी आर्थिक मदत करणारे विविध प्रकारचे सामाजिक कामे करणारे श्री.अशफाक हमीद खान यांचे नाव वॉर्डातील टाऊन हॉल येथील आमखास, टी.बी.हॉस्पीटल ते आमखास सलमान हिल पर्यंतच्या रस्त्यास या भागातील रहिवासीयांच्या मागणीनुसार त्याचे नाव देण्यात यावे. आजपर्यंत या रस्त्यास कोणाचेही नाव दिलेले नाही.

करीता, माझ्या वॉर्डातील टाऊन हॉल भागातील असलेल्या टाऊन हॉल येथील आमखास टी.बी. हॉस्पीटल ते आमखास सलमान हिल पर्यंतच्या रस्त्यास श्री.अशफाक हमीद खान मार्ग असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.सय्यद मतीन रशीद **अनुमोदकः-** श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२०, टाऊन हॉल भागातील असलेल्या टाऊन हॉल येथील आमखास टी.बी. हॉस्पीटल ते आमखास सलमान हिल पर्यंतच्या रस्त्यास नियमाप्रमाणे श्री.अशफाक हमीद खान मार्ग असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२० मधील ज्येष्ठ नागरीक सामाजिक एकतासाठी अहोरात्र परिश्रम करणारे श्री.सय्यद रशिद महेमुद यांनी स्लम भागातील रहिवासीयांसाठी त्यांच्या परीने विविध प्रकारचे सामाजिक कामे करीत आहेत. वॉर्डातील रहिवासीयांच्या मागणीनुसार माझ्या वॉर्डातील टाऊन हॉल भागातील आनंदनगर येथील वसाहत अंतर्गत असलेल्या लहानशा उद्यानास आता पर्यंत कोणाचेही नाव देण्यात आलेले नाही.

करीता माझ्या वॉर्डातील टाऊन हॉल भागातील आनंदनगर येथील वसाहत अंतर्गत असलेल्या लहानशा उद्यानास श्री.सय्यद रशिद महेमुद असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जमीर अहेमद कादरी **अनुमोदक:-** श्री.सय्यद मतीन रशीद

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२०,टाऊन हॉल भागातील आनंदनगर येथील वसाहत अंतर्गत असलेल्या लहानशा उद्यानास नियमाप्रमाणे श्री.सय्यद रशिद महेमुद असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील वार्ड क्र.६१ करिता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | अ.क्र | जुने कामाचे नांव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR Ward-C 22 | ०६ | वार्ड क्र.६१ अलतमश कॉलनी आझाद चौक येथे हायमॅस्ट बसविणे. आर्थिक तरतुद १० लक्ष. | १. वार्ड क्र.६१ मध्ये विविध ठिकाणी जी.आय. पोल व फिटींग बसविणे या कामासाठी ०५ लक्ष वळती करणे.<br>२. वार्ड क्र.६१ मध्ये विविध ठिकाणी फिटींग बसविणे व सिक्ससेट बसविणे. या कामासाठी ०५ लक्ष रुपये वळती करण्यात यावे. |

**सुचक:-** श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी,

**अनुमोदक:-** श्रीमती नसरीन बेगम समदयार खान, श्री.खान इरशाद इब्राहिम.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील वार्ड क्र.६१ करिता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नांव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR Ward-C | ०६ | वार्ड क्र.६१ अलतमश कॉलनी आझाद चौक येथे | १. वार्ड क्र.६१ मध्ये विविध ठिकाणी जी.आय. पोल व फिटींग बसविणे या कामासाठी ०५ |

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | | हायमॅस्ट बसविणे. आर्थिक तरतुद १० लक्ष. | लक्ष वळती करणे.<br>२. वार्ड क्र.६१ मध्ये विविध ठिकाणी फिटींग बसविणे व सिक्ससेट बसविणे. या कामासाठी ०५ लक्ष रुपये वळती करण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०५, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | अ.क्र | जुने कामाचे नांव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR Ward-f-p.no.54 | ३ | वार्ड क्र.१०५, राहुलनगर, बनेवाडी येथील मनपा शाळा आदर्श शाळा करणे- आर्थिक तरतुद १५ लक्ष | वार्ड क्र.१०५ मध्ये राहुलनगर व सादातनगर मधील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |
| Pro-poor budget New work p.no.12 | ०३ | वार्ड क्र.१०५, राहुलनगर, मनपा शाळे पासून ते स.सादात कब्रस्ताना पर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण करुन मजबुतीकरण करणे<br>आर्थिक तरतुद १० लक्ष. | वार्ड क्र.१०५ मध्ये मोसिन किराणा ते गल्ली नं.१० पर्यंत डांबरीकरण करणे या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |
| SCR Ward-f-p.no.47 | ०३ | सादातनगर येथे नाल्याची संरक्षीत भींत बांधणे- आर्थिक तरतुद १० लक्ष. | वार्ड क्र.१०५, राहुलनगर रिक्षा स्टॅण्ड ते सादातनगर नॅशनल किराणा पर्यंत सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे.<br>या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-** श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी,
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०५, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नांव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR Ward-f-p.no.54 | ३ | वार्ड क्र.१०५, राहुलनगर, बनेवाडी येथील मनपा शाळा आदर्श शाळा करणे- आर्थिक तरतुद १५ लक्ष | वार्ड क्र.१०५ मध्ये राहुलनगर व सादातनगर मधील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |
| Pro-poor | ०३ | वार्ड क्र.१०५, राहुलनगर, मनपा शाळे | वार्ड क्र.१०५ मध्ये मोसिन किराणा ते |

| | | | |
|---|---|---|---|
| budget New work p.no.12 | | पासून ते स.सादात कब्रस्ताना पर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण करुन मजबुतीकरण करणे<br>आर्थिक तरतुद १० लक्ष. | गल्ली नं.१० पर्यंत डांबरीकरण करणे या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |
| SCR Ward-f- p.no.47 | ०३ | सादातनगर येथे नाल्याची संरक्षीत भींत बांधणे- आर्थिक तरतुद १० लक्ष. | वार्ड क्र.१०५, राहुलनगर रिक्षा स्टॅण्ड ते सादातनगर नॅशनल किराणा पर्यंत सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे.<br>या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वर कॉलनी, मुकूंदवाडी, संजयनगर येथील व्हाईट टॉपींग रस्ते अतिशय खराब झालेले आहे. करिता तेथे व्हाईट टॉपींग रस्ते तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या गलिच्छ वस्ती निर्मुलन निधीतुन योजने अंतर्गत रु.एक कोटी (रु.१,०००,००००/-) रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्याच्या शिफारशीसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.कमलाकर शामराव जगताप **अनुमोदक:-** श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वर कॉलनी, मुकूंदवाडी, संजयनगर येथे व्हाईट टॉपींग रस्ते करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या गलिच्छ वस्ती निर्मुलन निधी योजने अंतर्गत रु.एक कोटी (रु.१,०००,००००/-) चा निधी उपलब्ध होणेकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा कंपनीच्या समोर रोड साईडला व आय.टी.ऑफीस समोर अनाधिकृत टपऱ्या टाकुन अतिक्रमण करतात, किंवा त्या ठिकाणी कचरा, घाण, घरगुती बांधकाम मटेरियल किंवा फरशिची तुकडे, हे आणून टाकतात. त्यामुळे एम.आय.डी.सी.चा परिसर अस्वच्छ होत आहे. व त्या जागेवर हळु हळु अतिक्रमण वाढत आहे. हे अतिक्रमण व परिसर सुरक्षित राहण्यासाठी प्रत्येक कंपनी व्यवस्थापकाने आपल्या कंपनी समोरिल जागा स्वच्छ ठेवुन तेथे झाडे लावून आपल्या नावाचे फलक लावावेत करीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा कंपनीच्या समोर रोड साईडला व आय.टी.ऑफीस समोर अनधिकृत टपऱ्या, अतिक्रमण होऊ नये व सदरील परिसर सुरक्षित राहण्यासाठी प्रत्येक कंपनी व्यवस्थापकाने आपल्या कंपनी समोरिल जागा स्वच्छ ठेवुन तेथे झाडे लावून आपल्या कंपनीच्या नावाचे फलक लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पडेगांव येथील महानगरपालिकेच्या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. या शाळेत गरीब, सर्वसामान्य घराण्यातील नागरीकांची मुले शिक्षण घेण्यासाठी येतात. सातवीच्या पुढे वर्ग नसल्यामुळे ते आपल्या मुलांना पुढील शिक्षण देऊ शकत नाहीत.

करिता पडेगाव गावातील महानगरपालिकेच्या शाळेत पुढील ८ वी ते १० वी चे वर्ग सुरु करण्यात यावेत.

तसेच या ठिकाणी शिक्षकांची नियुक्ती आवश्यकतेनुसार फर्निचर, शालेय साहित्य पुरविण्यात यावे व सर्व सुविधेनुसार ८ वी ते १० वी चे वर्ग सुरु करण्याची कार्यवाही नियमानुसार करण्यात यावी.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-** श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगांव येथील महानगरपालिकेच्या शाळेत ८ वी ते १० वी चे वर्ग सुरु करुन या ठिकाणी शिक्षकांची नियुक्ती, आवश्यकतेनुसार फर्निचर, शालेय साहित्य पुरविण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-१४, पडेगांव येथे चिनार गार्डन समोर असलेल्या महानगरपालिकेच्या भुखंडावर दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत व्यायाम शाळा, वाचनालय व बुध्द विहार उभारण्या करीता ' दोन कोटी रुपयाची ' तरतुद करण्यात यावी.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-** श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-१४, पडेगांव येथे चिनार गार्डन समोर असलेल्या महानगरपालिकेच्या भुखंडावर दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत व्यायाम शाळा, वाचनालय व बुध्द विहार उभारण्या करीता 'दोन कोटी रुपया' चा निधी उपलब्ध होणेकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती डॉ.शाहीन फातेमा भ्र.मोहसीन अहेमद (M.A.,D.ED.,Ph.D.) ह्या महानगरपालिका शाळा क्र.१ अंतर्गत सहशिक्षिका म्हणून कार्यरत असून त्यांना महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी यांनी सन २०१५-२०१६ चा "आदर्श शिक्षक पुरस्कार" देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. तसेच बिहार राज्याने डॉ.शाहीन फातेमा यांनी शिक्षणावर आधारित लिहिलेल्या "मराठवाडा में उर्दु गज़ल आझादी के बाद" ह्या पुस्तकाला प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे (सन २०१५-२०१६). तसेच केंद्र शासनाच्या एच.आर.डी.विभाग, कौमी कौन्सील बराए फरोग-ए-उर्दु ज़बान यांनी डॉ.शाहीन फातेमा यांनी शिक्षणावर आधारीत "गुलदस्त-ए-मज़ामीन शाहीन" या लिहिलेल्या पुस्तकाला पसंती दाखवून पुस्तक प्रकाशित करण्यासाठी अनुदान मंजुर केले आहे. माजी राष्ट्रपती, श्री.फखरोद्दीन अली अहमद ट्रस्ट, लखनऊ, उत्तरप्रदेश शासन यांनी डॉ.शाहीन फातेमा यांच्या "मराठवाडा में उर्दु गज़ल आझादी के बाद" या लिहिलेल्या पुस्तकाला पसंती दाखवून सन २०१४-२०१५ मध्ये प्रकाशनासाठी अनुदान मंजुर केले आहे.

यापुर्वी “हुरूफ-ए-शनासी” हे त्यांचे नविन शिक्षण धोरणावर आधारीत पुस्तक सुध्दा प्रकाशित झालेले आहे. तसेच विद्यार्थ्यांचे व महिलांचे मनोबल वाढविण्यासाठी “हौसलो से उड़ान” हे पुस्तक त्यांनी लिहिलेले आहे. या व्यतिरिक्त त्यांचे दोन पुस्तके सुध्दा लिहिण्याचे कार्य सुरु आहे. त्या गेले ३० वर्षापासून शिक्षण सेवेत कार्यरत आहेत. सदरील महिला शिक्षिकेच्या अशा अनमोल कामगिरीमुळे संपूर्ण देशात, महानगरपालिका औरंगाबाद शिक्षण विभागाचे नांव उज्वल झाले आहे. अशा कर्तबगार आदर्श शिक्षिकेचे मनोबल उंचावण्यासाठी व त्यांच्या कार्यांचा गौरव करून त्याची नवीन पिढीला जाणीव होण्यासाठी महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मार्फत एकमताने प्रस्ताव मंजुर करून त्यांच्या कामाचा गौरव, अभिनंदन व त्यांचा सत्कार करण्यात यावा.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद **अनुमोदक:-** श्रीमती संगिता सुभाष वाघुले.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शाळा क्र.१ अंतर्गत सहशिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती डॉ.शाहीन फातेमा भ्र.मोहसीन अहेमद (M.A.,D.ED.,Ph.D.) यांचे शिक्षण क्षेत्रातील विविध योगदाना बद्दल नियमाप्रमाणे महानगरपालिकेतर्फे त्यांच्या कामाचा गौरव, अभिनंदन व त्यांचा सत्कार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नंदनवन कॉलनी, प्रभाग क्र.१७ येथील महानगरपालिकेच्या शाळेलगत असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळ्या भुखंडावर दलित वस्ती विकास योजने अंतर्गत तीन मजली इमारत उभारून परिसरातील तरुणांसाठी व्यायाम शाळा, एक भव्य वाचनालय व विपश्यना केंद्र उभारण्याकरीता ‘तीन कोटी रुपये’ उपलब्ध करुन देण्यात यावे. असा प्रस्ताव मंजुर करून सामाजिक न्याय विभाग मंत्रायल, मुंबईकडे पाठविण्यात यावा.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

**अनुमोदक:-** श्री.लक्ष्मण रुपचंद वाघमारे, श्री.सुभाष सयाजी शेजवळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नंदनवन कॉलनी, प्रभाग क्र.१७ येथील महानगरपालिकेच्या शाळेलगत असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळ्या भुखंडावर दलित वस्ती विकास योजने अंतर्गत नियमाप्रमाणे तीन मजली इमारत उभारून परिसरातील तरुणांसाठी व्यायाम शाळा, एक भव्य वाचनालय व विपश्यना केंद्र उभारण्याकरीता ‘तीन कोटी रुपये’ उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव सामाजिक न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याकडे नियमाप्रमाणे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र./जिनिस/जिवायो/२०१६-२०१७/१८११ दिनांक १५.०६.२०१६ अन्वये.

१. मनपा औरंगाबाद अंतर्गत वॉर्ड क्र.४९ येथील जूना बाजार अब्दुल अजिम मार्ग पासून ते नेहरु भवनपर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. रक्कम रूपये ७५.०० लक्ष.

२. मनपा औरंगाबाद अंतर्गत वॉर्ड क्र.५३ येथील बारूदगरनालापासून ते औरंगपुरा भाजी मंडी पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. रक्कम रुपये २५.०० लक्ष.

या दोन कामासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-२०१७ साठी प्रस्ताव सादर करणे बाबत. कळविण्यात आले आहे.

तरी वरील कामासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता परिपुर्ण प्रस्ताव तयार करून मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना सादर करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.ढगे गंगाधर नामदेव **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी, श्रीमती शेख समिना शेख इलियास

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९, जूना बाजार येथील श्री.अब्दुल अजिम मार्ग पासून ते नेहरुभवन पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे रक्कम रूपये ७५.०० लक्ष व वॉर्ड क्र.५३ येथील बारूदगरनाल्या पासून ते औरंगपुरा भाजीमंडी पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष ही दोन्ही कामे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत करण्यासाठी परिपुर्ण प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठवणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळीचे विषय</u>

मा.महापौर :ऐनवेळीचे हे प्रशासनाचे व काही स.सदस्यांचे विषय आहेत ते सर्व विषय मंजुर करण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ५२४:-</u>** **<u>(शहर अभियंता)</u>**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद तर्फे मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.निराला बाजार ते (तापडीया सर्कल) ते नागेश्वरवाडी गणपती मंदिरापर्यंत १५ मीटर रुंद विकास योजना हा शहरातील मुख्य रस्ता असून हा रस्ता वॉर्ड क्र.५१ नागेश्वरवाडी, वॉर्ड क्र.५३ औरंगपुरा व वॉर्ड क्र.६८ समर्थनगर या तीन वॉर्डातून संयुक्तरीत्या जात आहे. या परिसरातील शैक्षणिक संस्था शासकीय व खाजगी कार्यालये, बाजारपेठ तसेच विद्यापीठ व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व महानगरपालिका मुख्य कार्यालय यांना जोडणारा मुख्य रस्ता आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते.

सद्यस्थिती हा सदरील रस्ता हा अत्यंत खराब झाला असून Pot Holes पडलेले असून रस्त्याचे सद्यस्थितीत संपुर्ण आयुष्य संपलेले असल्याने रस्त्यावरील वाहतूकीचे प्रमाण बघता रस्त्याची पुनर्बांधणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंजुर दरपत्रक सन २०१५-१६ नुसार रक्कम रुपये १,५५,३०,४७६/- प्रस्तावास मा.आयुक्तांनी दिनांक ०३.०८.२०१६ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

करीता निराला बाजार (तापडीया सर्कल) ते नागेश्वरवाडी गणपती मंदीरापर्यंत १५ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व व्हाईट टॉपींग करण्याचे अंदाजपत्रक रु.१,५५,३०,४७६/- प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निराला बाजार (तापडीया सर्कल) ते नागेश्वरवाडी गणपती मंदीरापर्यंत १५ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व व्हाईट टॉपींग करण्याच्या रक्कम रुपये १,५५,३०,४७६/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बायजीपुरा येथील ६०.०० फुट विकास योजना रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉँक्रेटिंग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१४-२०१५ च्या दरसुचनीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९९,७४,९५४/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील पान क्र. E-५८ अ.क्र.०२ मध्ये उपलब्ध विकास योजने अंतर्गत रसते मजबुतीकरण करणे या लेखाशिर्षात ठेवण्यात आलेल्या रक्कम रु.६००.०० लक्ष तरतुदी मधून करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास रस्त्यास फुटपाथ करणे, स्ट्रॉम वॉटर ड्रेन बांधणे या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रु.९९,७४,९५४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बायजीपुरा येथील ६०.०० फुट विकास योजना रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉँक्रेटिंग करणेच्या कामाच्या रक्कम रु.९९,७४,९५४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२६:-** **(उपआयुक्त प्रशासन)**

मा.आयुक्तांचे मान्यतेने उपआयुक्त (प्रशासन) यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुरज ताकसांडे व श्री.मयुर बोठारे हे औरंगाबाद शहरातील उत्कृष्ठ जिम्नॅस्टिक असून गेल्या १८ वर्षापासून क्रिडा क्षेत्रात संलग्न आहे. तसेच औरंगाबाद शहराचे नाव उंचावलेले आहे. तसेच शहरासाठी दोन्ही क्रिडापटू भुषणावह आहेत. त्यांची आजपर्यंत अनेक पदके प्राप्त केलेले आहेत.

१४ व्या जागतीक एरोबिक जिम्नॅस्टिक स्पर्धा इचीओन दक्षिण कोरीया येथे दिनांक १३ ते १९ जून २०१६ या दरम्यान संपन्न झालेल्या आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विमान प्रवास खर्च, राहण्याचा खर्च, व्हिसा, किट व प्रवेश शुल्क याकरीता दोघांना प्रत्येकी एकूण रक्कम रुपये १,११,९००/- असे एकुण रक्कम रुपये २,२३,८००/- (अक्षरी दोन लाख तेवीस हजार आठशे फक्त) इतका खर्च आला आहे.

वरील प्रमाणे दोन्ही खेळाडुंची घरची आर्थिक परिस्थीती बरोबर नसल्यामुळे त्यांनी अर्जाद्वारे आर्थिक मदत मिळणेबाबत पत्राद्वारे विनंती केली आहे. औरंगाबाद महापालिकेतर्फे दोन्ही खेळांडूना प्रत्येकी २५ हजार असे एकूण रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार फक्त) आर्थिक मदत मान्यतेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १३ ते १९ जून २०१६ या दरम्यान इचीओन, दक्षिण कोरीया येथे संपन्न झालेल्या १४ व्या जागतीक एरोबिक जिम्नॅस्टिक स्पर्धेत औरंगाबाद शहरातील सहभागी

श्री.सुरज ताकसांडे व श्री.मयुर बोठारे या जिम्नॅस्टिक खेळाडूंना औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रत्येकी रक्कम रुपये २५०००/- असे एकुण रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रुपये फक्त) नियमाप्रमाणे आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२७:-**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरामध्ये एक लाख झाडे लावणे व लावलेल्या झाडांचे संरक्षण करण्यासाठी वृक्ष संरक्षक जाळी (ट्रि गार्ड) लावण्याकरीता सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात प्रत्येक वॉर्डासाठी एक लाखाची तरतुद या प्रमाणे रुपये १,१५,००,०००/- (एक कोटी पंधरा लक्ष) ची तरतुद करण्यात आलेली आहे. वृक्ष संवर्धनाकरीता लोखंडी ट्रि गार्ड व प्लास्टिक ट्रि गार्डचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | तपशील | अंदाजपत्रकीय दर | अंदाजपत्रकीय दरानुसार ट्रि गार्डची संख्या |
|---|---|---|---|
| १ | लोखंडी ट्रि गार्ड पुरवठा करणे | ८६५.०० | १३,२९४/- |
| २ | प्लास्टिक ट्रि गार्ड पुरवठा करणे | १९०.०० | ६०,५२६/- |

रुपये १,१५,००,०००/- (एक कोटी पंधरा लक्ष) च्या अंदाजपत्रकास व कोणत्या प्रकारचे ट्रि गार्ड खरेदी करावे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरामध्ये एक लाख झाडे लावणे व लावलेल्या झाडांचे संरक्षण करण्यासाठी वृक्ष संरक्षक जाळी (ट्रि गार्ड) खाली दिलेल्या तपशीलाप्रमाणे खरेदी करण्यासाठीच्या रक्कम रुपये १,१५,००,०००/- (एक कोटी पंधरा लक्ष) च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

| अ क्र | तपशील | अंदाजपत्रकीय दर | अंदाजपत्रकीय दरानुसार ट्रि गार्डची संख्या |
|---|---|---|---|
| १ | लोखंडी ट्रि गार्ड पुरवठा करणे | ८६५.०० | १३,२९४/- |
| २ | प्लास्टिक ट्रि गार्ड पुरवठा करणे | १९०.०० | ६०,५२६/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२८:-** **(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका क्षेत्र अंतर्गत वॉर्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी, शांतीपूरा,न्यु नंदनवन कॉलनी, भुजबळ नगर तसेच शिवपुरी भागात ५०% पेक्षा जास्त प्रमाणात दलित वस्ती अधिकृत/अनधिकृत रित्या विकसीत झालेली आहे. सदर वसाहती साधारणत: १५ ते २० वर्षापुर्वीच्या असून वसाहतीतील काही भागांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे सदरील वसाहतीत राहणारे नागरीक टँकर व बोरवेलद्वारे पाण्याची गरज भागवितात. त्यामुळे काही भागांमध्ये पाणी पुरवठा सुधारणा करणे आवश्यक आहे. वसाहतीमधील काही भाग हा डोंगरालगत विकसीत झालेला असून परिसरामधील बोरवेलचा पाणीसाठा कमी झालेला आहे. संबंधीत वॉर्डाच्या स.नगरसेविका यांनी उपरोक्त परिसराकरीता नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी टाकण्याबाबत मागणी केली आहे. तसेच दिनांक १४.०९.२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१३९ अंतर्गत शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रभाग क्र.१७ येथील दलित बहुल वसाहतींचा विकास होणेकरीता प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठविण्यास मंजुरी प्रदान झालेली आहे.त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुचि सन २०१२-१३ नुसार रक्कम रुपये ६०,०१,४५२/- किंमतीचे अंदाजपत्रक व प्रस्ताव निधी उपलब्धते करीता

मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना दिनांक १५.०२.२०१६ रोजी सादर केला होता. सदर प्रस्तावाला मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पत्र क्र.प्र.मा.क्र.२०१६/नपाप्र/नागरी दलित वस्ती/मनपा/प्र.मा./ कावि/३५७ दिनांक १३.०४.२०१६ अन्वये रुपये ६०,०१,४५२/- किंमतीच्या कामाला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

करीता उपरोक्त सर्व बाबी पाहता वर नमुद केल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १७ नंदनवन कॉलनी, शांतीपुरा व संलग्न परिसरात जलवाहीनी टाकण्याच्या रुपये ६०,०१,४५२/- किंमतीच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावास मान्यता प्रदान व्हावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. १७ नंदनवन कॉलनी, शांतीपुरा व संलग्न परिसरात जलवाहीनी टाकण्याच्या रक्कम रुपये ६०,०१,४५२/- किंमतीच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत मसनतपुर, शहानगर व नारेगाव अंतर्गत असलेल्या माणिकनगर रस्ता हे रस्ते अत्यंत खराब झाल्यामुळे नागरीकांना या रस्त्याने चालणेही त्रासदायक झाले आहे. नागरीक वेळोवेळी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी मागणी करीत आहे.

तरी, चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत मसनतपूर, शहानगर व नारेगांव अंतर्गत असलेल्या माणिकनगर रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. करीता सदरील रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करण्यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या मुलभूत सुविधे अंतर्गत प्राप्त अनुदानातून ५०% व महानगरपालिकेच्या हिश्श्यातून ५०% रक्कमेतून वरील रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

